रविवार, ११ डिसेंबर २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक १४३
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड
www.ramprahar.com

## अंतरंग

रविवारनिमित्त 'झूमप्रहर'मध्ये मनोरंजनात्मक विशेष लेख/४
विदेशी मद्याची वाहतूक करणारे पनवेल स्टेशनमधून ताब्यात/६
किशोर, किशोरी अजिंक्यपद कबड्डीत वेश्वीला दुहेरी मुकुट/८

## पारा घसरला! राज्यात पुन्हा थंडीचा कडाका वाढला



**पुणे :** गेल्या दोन दिवसांपासून राज्यात सर्वत्र थंडीचा कडाका वाढला आहे. विशेषत: विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात थंडीची तीव्रता अधिक आहे. पश्चिम महाराष्ट्रातही गारठा कायम असून मुंबईसह कोकणातही पारा घसरला आहे. उत्तर भारतात बहुतांश भागांत थंडीची तीव्र लाट पसरली आहे. उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्यांच्या प्रभावामुळे राज्यातील थंडीत मोठी वाढ झाली आहे. दिवसभर आकाश अंशतः ढगाळ जरी असले तरी उत्तर भारतातून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे पुन्हा एकदा कडाक्याची थंडी वाढत चालली आहे. मंगळवार (दि. १३)पर्यंत आकाश अंशतः ढगाळ राहून दुपारी किंवा संध्याकाळी मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटात अति हलक्या ते हलक्या स्वरूपाच्या पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे.



महाराष्ट्र राज्य सरकार निर्मित
हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे
महाराष्ट्र समृद्धी महामार्ग



महाराष्ट्राच्या समृध्दीची भाग्यरेषा

पहिल्या टप्प्याचे
(नागपूर - शिर्डी ५२० कि.मी.चे) उद्घाटन
भारताचे माननीय प्रधान मंत्री श्री. नरेंद्रजी मोदी, यांच्या हस्ते



MSRDC
HINDU HRUDAYSAMRAT BALASAHEB THACKERAY MAHARASHTRA SAMRUDDHI MAHAMARG
Azadi Ka Amrit Mahotsav

- महाराष्ट्रातील १० जिल्ह्यांना जोडणार
- १३ लाख वृक्षारोपण
- २५० मेगावॅटचा सौर उर्जा प्रकल्प
- १८ कृषी समृद्धी केंद्र उभारणार
- पर्यटनाला चालना
- मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती



भारतातील सर्वात जास्त लांबीचा (७०१ कि. मी.) वेगवान महामार्ग,
करणार इंधन आणि वेळेची बचत.

• यांच्या प्रमुख उपस्थितीत •

श्री.एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य


श्री. नितीन गडकरी
रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री, भारत सरकार

श्री. देवेंद्र फडणवीस
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

दिनांक ११ डिसेंबर २०२२, सकाळी ९:३० वाजता.
ठिकाण - टेम्पल ग्राऊंड (मंदिर मैदान), अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स), नागपूर -४४१ १०८

www.msrdc.in

रविवार, ११ डिसेंबर २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक १४३
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड



**समृद्धी महामार्ग दृष्टिक्षेपात...**
- एकूण लांबी : ७०१ किमी
- पहिला टप्पा : ५२० किमी
- रुंदी : १२० मी (डोंगराळ भागासाठी ९० मी)
- मार्गिका : 3+3
- मोठे पूल : 32
- लहान पूल : ३१७
- बोगदे : ७
- रेल्वे ओव्हर ब्रिज : ८ व्हाया डक्ट
- फ्लाय ओव्हर : ७3
- कल्व्हर्ट : ७६२

# समृद्धी महामार्गाचे आज पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते लोकार्पण



**नागपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या समृद्धीची भाग्यरेषा असलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचे रविवारी (दि. ११) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण होणार आहे. हा महामार्ग विदर्भ, मराठवाडा भागात औद्योगिक क्रांती करणारा ठरणार आहे.

सकाळी सव्वा नऊच्या सुमारास नागपूर विमानतळावर पंतप्रधानांचे आगमन होणार असून त्यानंतर खापरी मेट्रो स्टेशन, नागपूर फेज १चे उद्घाटन, वंदे मातरम ट्रेनला हिरवा झेंडा दाखविणे, मिहान एम्सचे लोकार्पण, त्यानंतर वायफळ टोल नाका येथून समृद्धी महामार्गाचे लोकार्पण होणार आहे. या काळात पंतप्रधान मोदी नागपूर मेट्रोमधून प्रवास करणार असून झीरो माईल्स ते वायफळ टोलनाका असा प्रवासदेखील करणार आहेत. टेम्पल मैदानावर पंतप्रधानांची सभा होणार आहे.

या सोहळ्याला राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, अश्विनी वैष्णव, हरदीप पुरी, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री भारती पवार, रावसाहेब दानवे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## आयरन माउंटन कंपनीच्या कामगारांना पूर्ववत कामावर घ्या!

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली 'रास्ता रोको'

### कामगार आयुक्त कार्यालयात उद्या संयुक्त बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील आजिवली गावस्थित आयरन माउंटन कंपनीने कामगारांना कामावरून कमी केल्याने त्या विरोधात भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शनिवारी (दि. १०) रास्ता रोको आंदोलन करून कंपनी व्यवस्थापनाला इशारा दिला. त्यामुळे या कामगारांसंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी कामगार आयुक्तांसमवेत व्यवस्थापन आणि पोलीस प्रशासनाची बैठक होणार आहे. कामगारांना कामावर पूर्ववत घ्या; नाही तर यापेक्षा मोठे आंदोलन करण्याचा गर्भित इशारा आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिला आहे.




(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ८ वर..

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात भाजपचे तालुका सरचिटणीस व माजी जि. प. सदस्य राजेंद्र पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, ज्येष्ठ कार्यकर्ते सुभाष पाटील, आप्पा भागीत, राम गोजे, भाजपचे गुळसुंदे जि. प. विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, युवा नेते अनिल पाटील, तानाजी पाटील, शिवाजी माळी, प्रवीण ठाकूर, महेंद्र गोजे, अनंतबुवा पाटील, रवी शेळके, संदेश गोजे यांच्यासह कार्यकर्ते आणि ग्रामस्थ शेकडोंच्या संख्येने सहभागी झाले होते.

आयरन माऊंटन कंपनीत काम करणाऱ्या स्थानिक कामगारांना अचानकपणे व्यवस्थापनाने कामावरून कमी करीत बेरोजगार केले आहे. त्यामुळे या कामगारांना पूर्ववत कामावर न घेतल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. कंपनी व्यवस्थापनाने या संदर्भात दुर्लक्ष केल्याने आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत शेकडो कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि कामगारांनी मुंबई-पुणे महामार्गावर ठिय्या आंदोलन केले आणि जोपर्यंत हा प्रश्न निकाली लागत नाही तोपर्यंत हटणार नाही, अशी भूमिका देत घोषणांनी आसमंत दणाणून सोडले. आंदोलनाचे स्वरूप तीव्र होण्याचे चित्र दिसताच पोलीस प्रशासनाने यामध्ये मध्यस्थी केली. त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना आंदोलन मागे घेण्यास सांगितले, मात्र जोपर्यंत कामगारांना कामावर पूर्ववत घेत नाही तोपर्यंत जागेवरून हलणार नसल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी ठणकावून सांगितले.

अखेर पोलिसांनी या संदर्भात कंपनी व्यवस्थापनासोबत बैठक घेण्याचे आश्वासन दिले. त्या अनुषंगाने सोमवारी खांदा कॉलनी येथील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत कामगार आयुक्त, व्यवस्थापन अधिकारी व पोलीस यांची बैठक होणार आहे. त्यामुळे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आल्याची घोषणा या वेळी करण्यात आली, मात्र कामगारांना न्याय मिळवून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्पष्ट केले आहे.

## ज्येष्ठ लावणी गायिका सुलोचना चव्हाण यांचे निधन



**मुंबई : प्रतिनिधी**

लावणीसम्राज्ञी, ज्येष्ठ पार्श्वगायिका सुलोचना चव्हाण यांचे शनिवारी (दि. १०) वृद्धत्वाने निधन झाले. त्या ९२ वर्षांच्या होत्या. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. मुंबईतील गिरगावच्या फणसवाडी येथील निवासस्थानी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने संपूर्ण कलासृष्टीतून हळहळ व्यक्त होत आहे.

लावणी आणि सुलोचना चव्हाण यांचे वेगळेच नाते होते. मराठी चित्रपटसृष्टीत ठसकेबाज लावणी गात त्यांनी एक वेगळीच भुरळ श्रोत्यांना घातली. 'फड सांभाळ तुऱ्याला गं आला...' 'पाडाला पिकलाय आंबा..' 'मला म्हणत्यात पुण्याची मैना' यांसारख्या एकाहून एक लावण्या सुलोचनाबाईंनी आपल्या खर्जातील आवाजाच्या जादूने ठसकेबाज केल्या. याच वर्षी त्यांचा पद्मश्री पुरस्काराने सन्मान करण्यात आला होता. तेव्हा व्हिलचेअरवर बसूनच त्यांनी तो स्वीकारला होता. तेव्हापासून सुलोचना यांची प्रकृती फारशी चांगली नसल्याचे दिसले होते. यानंतर त्या कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमातही दिसल्या नाहीत.

सुलोचना चव्हाण यांना गंगा-जमना पुरस्कार, राज्य सरकारचा जीवनगौरव पुरस्कार, पुणे महापालिकेतर्फे सन २००९चा राम कदम पुरस्कार, सन २०११चा महाराष्ट्र सरकारचा लता मंगेशकर पुरस्कार अशा पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले आहे. त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## निवडक

### मंदोस चक्रीवादळाचे तांडव; तामिळनाडूत चौघांचा मृत्यू

**चेन्नई :** मंदोस चक्रीवादळ शनिवारी (दि. १०) पहाटे दोनच्या सुमारास चेन्नईच्या किनारपट्टीवर धडकले आणि त्याने समुद्र किनाऱ्यावर तांडव केले. यामुळे तामिळनाडूमध्ये चार जणांचा मृत्यू झाला असून इतरही नुकसान झाले आहे तसेच वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे. दरम्यान, चक्रीवादळामुळे तामिळनाडूसह तीन राज्यांत रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

### मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर शाईफेक; सर्वपक्षीयांकडून निषेध

**पुणे :** राज्याचे उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर शनिवारी (दि. १०) पुण्यात एका व्यक्तीने शाई फेकली. पोलिसांनी त्या व्यक्तीला लगेच ताब्यात घेतले. त्याचे नाव अद्याप समजलेले नाही. दरम्यान, दिलगिरी व्यक्त करूनही मंत्री पाटील यांना लक्ष्य केल्याने या प्रकरणाचा भाजपकडून निषेध व्यक्त केला जात आहे, तर शिवसेना, राष्ट्रवादीच्या नेत्यांनीही शाईफेक करणे निषेधार्ह असल्याचे म्हटलेय.

## माथेरानमध्ये व्हॅली क्रॉसिंग आणि साहसी खेळांचा पुन्हा थरार

### पालिकेच्या प्रस्तावावर मॉनिटरिंग कमिटी सकारात्मक



**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरानमधील पर्यटनाला चालना देण्यासाठी व्हॅली क्रॉसिंग आणि साहसी खेळांचा पुन्हा थरार सुरू होण्याची चिन्हे आहेत. याकरिता माथेरान गिरीस्थान नगर परिषदेने मागितलेल्या परवानगीच्या प्रस्तावावर इको सेन्सेटिव्ह झोनच्या सनियंत्रण समितीच्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली असल्याची माहिती पालिकेच्या मुख्याधिकारी आणि प्रशासक सुरेखा भणगे यांनी दिली.

माथेरानमधील तरुणांना जंगलाची पूर्ण माहिती असल्याने त्यांनी सुरू केलेल्या झिप लाईन म्हणजे व्हॅली क्रॉसिंग व्यवसायाला मोठा प्रतिसाद मिळू लागला, मात्र माथेरानच्या जंगलावर मालकी असलेल्या वन विभागाने व्हॅली क्रॉसिंगचे सर्व दोर मोठा बंदोबस्त मागवून तोडून टाकले आणि हा व्यवसाय बंद झाला.

दरम्यान, जुलै २०२१मध्ये राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील पर्यटनवाढीसाठी साहसी खेळांना मान्यता देण्यात आली. माथेरानमध्ये व्हॅली क्रॉसिंगसारखे साहसी खेळ हे पर्यटकांच्या आवडीचे केंद्र बनले होते. त्यामुळे ते पुन्हा सुरू व्हावेत यासाठी माथेरान पालिका आग्रही होती. राज्य सरकारने माथेरान पालिकेला सनियंत्रण समितीकडे प्रस्ताव सादर करायला सांगितले होते. त्या प्रस्तावावर दोन दिवसांपूर्वी अलिबाग येथे झालेल्या सनियंत्रण समितीच्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. त्यामुळे सनियंत्रण समिती याबाबत कधी निर्णय घेते याकडे माथेरानकरांचे लक्ष लागले आहे.

(छाया : चेतन पोपेटा)

(छाया : योगेश पाटील)



## खारघर मॅरेथॉनसंदर्भात बैठक उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

धावपटू आणि क्रीडारसिकांसाठी पर्वणी तसेच नवी मुंबईतील सर्वांत मोठी असलेली खारघर मॅरेथॉन जानेवारी २०२३मध्ये होणार आहे. त्या अनुषंगाने स्पर्धेच्या पूर्वतयारी व नियोजनसंदर्भात शुक्रवारी (दि. ९) खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या सौजन्याने खारघरमध्ये भव्य स्वरूपात मॅरेथॉनचे आयोजन केले जाते. उत्तम व नीटनेटक्या नियोजनामुळे खारघर मॅरेथॉन नेहमीच यशाची शिखरे पार करीत आली आहे.ही फक्त मॅरेथॉन नसून खारघर, पनवेलसह नवी मुंबई, रायगडची शान आहे. त्यामुळे या मॅरेथॉनचे सर्वांना वेध लागलेले असतात.

या बैठकीस स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे व्यवस्थापकीय संचालक तथा खारघर मॅरेथॉन स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक हरेश केणी, नितीन पाटील, अभिमन्यू पाटील, शत्रुघ्न काकडे, निलेश बाविस्कर, पापा पटेल, माजी नगरसेविका अनिता पाटील, आरती नवघरे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी ही मॅरेथॉन यशस्वी व्हावी याकरिता मार्गदर्शन केले.





## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात विज्ञान प्रदर्शन

### चेअरमन परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएसई विद्यालयात विज्ञान व कला प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्याचे उद्घाटन विद्यालयाचे चेअरमन तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. दरम्यान, या प्रदर्शनाला 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या वेळी मराठी माध्यमाचे चेअरमन शरद खारकर, स्कूल कमिटी सदस्य कविता खारकर, निलेश खारकर, मुध्याध्यापिका मुक्ता खटावकर आदी उपस्थित होते.

सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएसई विद्यालयातील पूर्व प्राथमिक विभागाने लाईफ लाइन ऑफ सिटी या विषयावर आधारित उपक्रम सादर केले तसेच प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयाबरोबरच इतरही सर्व शालेय शैक्षणिक विषयांवर आधारित नावीन्यपूर्ण उपक्रम सादर करून आपल्या कलागुणांची चुणूक दाखवली. याबद्दल मान्यवरांनी या उपक्रमशील विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.

## इशानचे धडाकेबाज द्विशतक




चट्टोग्राम : बांगलादेशविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताचा सलामीवीर फलंदाज इशान किशानने धडाकेबाज द्विशतक झळकाविले, तर विराट कोहलीने शतकी खेळी केली. या जोरावर भारताने बांगलादेशवर तब्बल २२७ धावांनी मोठा विजय मिळविला. (वृत्त पान ८ वर..)



महाराष्ट्र शासन | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | G20 भारत 2023 INDIA

# श्री. नरेंद्र मोदी

## मा. प्रधानमंत्री यांचे

# हार्दिक स्वागत

नागपूर येथे दि. ११ डिसेंबर, २०२२ रोजी
आयोजित विविध विकास कार्यक्रमांचा शुभारंभ
**श्री. नरेंद्र मोदी** मा. प्रधानमंत्री यांच्या
## शुभहस्ते

### हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग

महाराष्ट्राच्या विकासाची भाग्यरेखा ठरणाऱ्या रु.५५ हजार कोटींच्या सहापदरी महामार्गाच्या नागपूर शिर्डी या ५२० कि.मी. लांबीच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन.

### वंदे भारत एक्सप्रेस

नागपूर ते बिलासपूर या दोन शहरामधील प्रवासी वाहतुकीला गतिमानतेचा आयाम देणाऱ्या आणि ताशी १३० कि.मी. वेगाने धावणाऱ्या रेल्वे गाडीचा शुभारंभ.

### नागपूर मेट्रो फेज-१

नागपूर शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मजबूत करणाऱ्या ४० कि.मी. अंतराच्या रु.९३०० कोटी खर्चाच्या प्रकल्पाचे लोकार्पण.

### नाग नदी प्रदूषण निर्मुलन प्रकल्प

नागपूर शहरातील नाग नदीला नवे जीवन देणाऱ्या ४१ कि.मी. लांबीचा आणि रु.१९२७ कोटी खर्चाच्या प्रकल्पाचा पायाभरणी समारंभ.

### नागपूर मेट्रो फेज-२

नागपुरातील मेट्रो जाळे हिंगणा, कन्हान, बुटीबोरीपर्यंत विस्तारित करणाऱ्या ४४ कि.मी. अंतराच्या आणि रु.६७०० कोटी खर्चाच्या प्रकल्पाचा पायाभरणी समारंभ.

### अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, नागपूर

राज्याच्या वैद्यकीय क्षेत्रात नवे पर्व असणाऱ्या आणि १५० एकर क्षेत्रातील अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज संस्था राष्ट्राला समर्पित.

### नागपूर आणि अजनी रेल्वे स्टेशन पुनर्विकास प्रकल्प

नागपूर रेल्वे स्थानक पुनर्विकास प्रकल्पासाठी रु.५८९ कोटी आणि अजनी रेल्वे स्थानक पुनर्विकास प्रकल्पासाठी रु.३६० कोटी खर्चाच्या प्रकल्पाचा पायाभरणी समारंभ.





## गती निर्णयांची प्रगती महाराष्ट्राची!

श्री. देवेंद्र फडणवीस
मा. उपमुख्यमंत्री

श्री. एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री

www.mahasamvad.in | /MahaDGIPR | /MaharashtraDGIPR | महाराष्ट्र शासन

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**खरंतर ही कमालच झाली आणि ती कमाल होऊन चक्क पन्नास वर्षे कधी झाली हे समजलेच नाही. तसं तर सिनेमाच्या जगात कधी, काय, कुठे, कसे, कशाला घडेल, काय बिघडेल, काय उगवेल हे कधीच सांगता येत नाही म्हणूनच तर येथील छोट्या छोट्या गोष्टीही रंगतदार होतात. त्याच्या कधी 'ब्रेकिंग न्यूज' होतात तर कधी स्टोरीज होतात.**




# 'व्हिक्टोरिया नंबर २०३' पन्नाशीतही जोरात...



### झूम प्रहर



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

आता तुम्हाला सांगितले, पिक्चर सुपर हिट झाला आणि काही दिवसांतच वृत्तपत्रातील जाहिरातीत कलाकारांच्या नावाचे क्रम बदलले. काही आठवड्यात नवीन पोस्टर छापताना त्यावर चक्क चरित्र कलाकारांचे चेहरे मोठे झाले आणि हीरो हिरॉईन छोटे झाले आणि असे करता करता आता तो चित्रपटच चक्क पन्नास वर्षांनंतरही त्या चरित्र कलाकारांमुळेच ओळखला जातोय. तर तुम्ही म्हणाल, सिनेमाच्या जगात यश हेच चलनी नाणे असल्याने असे घडलेही असेल. सिनेमा म्हणजे सगळं काही यशासाठी यशाभोवती असते म्हटल्यावर काही घडायलाही हवेच.


हे घडले डायनामो इंटरनॅशनल फिल्म या बॅनरखालील निर्माता व दिग्दर्शक ब्रीज यांच्या 'व्हिक्टोरिया नंबर २०३' (प्रदर्शन ८ डिसेंबर १९७२) या चित्रपटाच्या वेळेस. (या मसालेदार मनोरंजक चित्रपटाच्या प्रदर्शनास पन्नास वर्षे पूर्ण कधी हो झाली? एवढी भरभर या चित्रपटातील घोडागाडी धावली?).

पिक्चर रिलीज होताना वृत्तपत्रातील जाहिरातीत म्हटलं होते, प्रमुख भूमिका अशोककुमार, सायरा बानू, नवीन निश्चल, रणजीत आणि प्राण. त्या काळात '... आणि प्राण' असे म्हणणे वैशिष्ट्यपूर्ण असे, यालाही एक ओळख होती, वलय होते. ते त्याने आपल्या बेहतरीन खलनायकीने मिळवले आणि मग चरित्र भूमिकेत रंग भरत कायमही ठेवले. अगदी त्याच्या आत्मचरित्राचे नावही '... आणि प्राण' असे आहे.

'व्हिक्टोरिया नंबर २०३'ला पब्लिकचा फर्स्ट डे फर्स्ट शोपासूनच भारी रिस्पॉन्स (मुंबईत मेन थिएटर मिनर्व्हा मॅटीनी शो) मिळाला आणि पब्लिक पिक्चर बघता बघता सुपर हिटही झाला. त्या काळात फर्स्ट डे फर्स्ट शोचा पब्लिक रिपोर्ट फायनल रिपोर्ट. आवाजी मतदान म्हणा ना? पिक्चरची मध्यवर्ती कल्पना हिऱ्यांची चोरी. पहिल्याच रिळात ते हरवतात आणि सोळा सतरा रिळांचा अनेक अपेक्षित अनपेक्षित वळणे घेण्याचा प्रवास सुरू होतो. ते हीरे २०३ नंबरच्या घोडागाडीच्या लालटेनमध्ये लपवलेत आणि धमाल रहस्यरंजक म्युझिकल प्रवास सुरू होतो. ही घोडागाडी एक युवती (सायरा बानू) पुरुषाच्या




वेशात चालवतेय. नायकाला (नवीन निश्चल) एकदा ते समजते. याच युवतीवर एका व्हीलनची (रणजित) बुरी नजर आहे. वगैरे वगैरे बराच मसाला खच्चून भरलाय. पटकथा लेखक के. ए. नारायणन यांची ती खासियतच होती, पटकथेत टर्न आणि ट्वीस्ट हवेतच. पब्लिक खुर्चीला खिळून बसला पाहिजे. त्या काळात दर दोन तीन चित्रपटानंतर हिऱ्याची चोरी असायचीच. मधला तिखट, मीठ, मसाला, हिंग, खारट, तेल, पाणी वेगळे असे आणि बनवण्याची पध्दत वेगळी असे. पण भाव खाऊन गेले जेलमधून सुटलेले राजा (अशोककुमार) व राणा (प्राण). हे खरं तर चलाख चोर. पण अतिशय मस्तीखोर. दो बेचारे बिना सहारे...असे रस्त्यावर गाता गाता सहज चोरी करणारे. दोघेही मुरब्बी अनुभवी अभिनेते. अभिनयात कमालीचे अष्टपैलू. दोघांना पब्लिकची भारी दाद मिळाली आणि पिक्चर सुपर हिट झाले. त्यांचा रुपेरी दंगा एन्जॉय करण्यात पब्लिकला रस आहे हे लक्षात येताच वृत्तपत्रातील जाहिरातीत आता नवीन क्रमाने म्हटले जाऊ लागले, अशोककुमार, प्राण वगैरे वगैरे...याची चक्क 'चौकटीतील बातमी' झाली. होय, अशाही गोष्टीची फिल्मी बातमी होते आणि आता नव्याने पोस्टर छापताना त्यावर हे दोघे केवढे तरी मोठे झाले आणि नवीन निश्चल कोपर्यात गेला. कुठे तर पोस्टरबाहेरच गेला. तसा तो ज्योती स्वरुप दिग्दर्शित 'परवाना' (१९७१)च्या पोस्टरवरूनही काही वर्षातच हीरो असूनही छोटा झाला आणि व्हीलन असूनही अमिताभ बच्चन मोठा झाला. कोणाला काय




तर कोणाला काय? पिक्चरमध्ये अन्वर हुसैन, शेट्टी, जानकीदास, मोहन चोटी, व्ही. गोपाल, मीना रॉय, राजेश खेरा, प्रतिमा देवी, हेलन इत्यादींच्या भूमिका. पण चर्चा राजा आणि राणाची. अभिनयाचे खणखणीत नाणे चालणारच. मिनर्व्हात मॅटीनी शोला पिक्चरने तब्बल साठ आठवडे मुक्काम केला. राजश्री वितरण या चित्रपटाचे वितरक होते. त्यांनी या पिक्चरची पठडी बघूनच मॅटीनी शोला रिलीजची खेळी करत यश प्राप्त केले. चित्रपटातील गाणी वर्मा मलिक यांची असून संगीत कल्याणजी आनंदजी यांचे आहे. दो बेचारे.. (पार्श्वगायक किशोरकुमार व महेंद्र कपूर), देखा मैने देखा सपनो की एक रानी को) (किशोरकुमार), तू ना मिलोगी तो (किशोरकुमार), थोडासा ठहरो (लता मंगेशकर) ही गाणी मनोरंजनात भर घालतात. एकदा का पब्लिकला पिक्चर आवडले की वत्यातील इतरही गोष्टी लोकप्रिय होतात. अनेक वर्षे दक्षिण मुंबईतील रस्त्यावर खरोखरच्या 'व्हीक्टोरिया नंबर २०३' चे दर्शन होताच फिल्म दिवाने सुखावत. या चित्रपटाचे छायाचित्रण अन्वर सिराज यांचे असून संकलन वामन राव यांचे आहे. दिग्दर्शक ब्रीजला या चित्रपटाच्या यशाने ओळख दिली. यश म्हणतात ते हेच तर असते. तोपर्यंत त्याने दो भाई, नाईट इन लंडन, यह रात फिर न आयेगी, 'यकिन' वगैरे क्राईम थ्रीलर चित्रपटांचे दिग्दर्शन केले होते. व्हीक्टोरियाच्या यशानंतर त्याने चोरी मेरा काम (अशोककुमार, शशी कपूर, झीनत अमान आणि प्राण), एक से बढकर एक (अशोककुमार, राजकुमार, शर्मिला टागोर, नवीन निश्चल आणि प्राण), मरदोवाली बात ( धर्मेंद्र, संजय दत्त व जयाप्रदा), या मसालेदार मनोरंजक चित्रपटात यश मिळवले. तर पैसे की गुडिया, मगरुर, तकदीर वगैरे चित्रपटाना रसिकांनी नाकारले.

ही यशोगाथा एवढ्यावरच थांबली नाही. सुपर हिट पिक्चरचे हेच वैशिष्ट्य असते. त्यांचे यश कधीच थांबत नाही. अशोककुमार व प्राण या चरित्र कलाकारांनाच नायक करीत शिबू मित्रा दिग्दर्शित 'राजा और राणा'(१९८४) हा चित्रपट आला. पण ती रंगत आली नाही...हिट पिक्चरची भट्टी एकदाच जमते आणि ठरवून पिक्चर रंगतदार बनत नाही. व्हिक्टोरिया नंबर...ची १९७४ साली तेलुगू (Andaru Dongale), १९९५ साली कन्नडमध्ये (गिड्डू दादा), २००५ साली बंगालीत (चोर चोर मस्तुदो भाई) तर झालेच पण ब्रीज यांचा मुलगा कमल सदनाह २००७ साली मूळ नावाने रिमेक निर्माण केली. यानिमित्त कमल सदनाहच्या भेटीचा आलेला योग मला फ्लॅशबॅकमध्ये नेणारा तर कमल सदनाहला आपल्या पित्याच्या सुपर हिट चित्रपटाची रिमेक केल्याचा आनंद देणारा होता. दोन पिढ्यांतील फरक हा असाही असू शकतो, पण अशोककुमार व प्राणची धमाल कोणालाच शक्य झाली नाही. अनंत महादेवनने दिग्दर्शन केले. अनुपम खेर राजा तर ओम पुरी राणा होता. तरी रंग भरला नाही. जिमी शेरगील व सोनिया मेहरा (विनोद मेहराची मुलगी) नायक नायिका होते. भरपूर पूर्वप्रसिध्दी केली, पण फर्स्ट शोपासूनच ही घोडागाडी जागची हलली नाही. अशोककुमार व प्राणची धमाल जोडी हीच 'व्हिक्टोरिया नंबर २००३'ची कायमचीच ओळख झाली. आज पन्नास वर्षांनंतरही हेच समिकरण हिट आहे. दो बेचारे बिना सहारे... ओ हसिना जरा रूक जाना ना हा पंच भारी हिट ठरला.

पिक्चर हिट है तो सब हिट है... मग घोडागाडीही बुलेट ट्रेनच्या वेगाने बॉक्स ऑफिसवर धावते.

---



# गुजरातमध्ये 'नमो'च!

**गुजरात विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने विक्रमी विजय मिळवित नवा इतिहास रचला आहे. मोदी लाटेत नव्हे; तर त्सुनामीत काँग्रेस, आम आदमी पक्ष अक्षरशः वाहून गेले. गुजरात म्हणजे मोदी आणि मोदी म्हणजे गुजरात हे समीकरण या निमित्ताने ठळकपणे अधोरेखित झाले आहे.**

गेल्या अडीच दशकांहून अधिक काळ गुजरातमध्ये सत्तेवर असलेल्या भाजपने याही वेळी विजयाची परंपरा कायम राखली. विशेष म्हणजे या निकालाला विक्रमाची झालर लाभली. यंदाच्या निवडणुकीत एकूण १८२ जागांपैकी १५६ जागी 'कमळ' फुलले. यासह भाजपने काँग्रेसचा १४९ जागांचा विक्रम मोडीत काढला. १९८५मध्ये माधवसिंह सोलंकी मुख्यमंत्री असताना काँग्रेसने हे यश प्राप्त केले होते. भाजपने त्याहून सात जागा अधिक जिंकत नवा विक्रम नोंदविला. त्याचबरोबर पश्चिम बंगालमधील डाव्यांच्या सात कार्यकाळांच्या विक्रमाशी भाजपने बरोबरी केली आहे.

गुजरात ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जन्मभूमी असल्याने साहजिकच या निवडणुकीला विशेष महत्त्व होते. यंदा गुजरातमध्ये भाजप विरुद्ध काँग्रेस असा पारंपरिक सामना होताच, शिवाय दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाने हवा केली होती. या व्यतिरिक्त एमआयएमनेही नशीब आजमाविण्याचा प्रयत्न केला, पण पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या करिष्म्यापुढे विरोधकांचे काहीएक चालले नाही. प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेसचा दारूण पराभव झाला. गेल्या वेळी ७७ जागा जिंकलेल्या काँग्रेसला या वेळी केवळ १७ जागा मिळाल्या. हा पक्षाचा आतापर्यंतचा नीचांक ठरला. आपही प्रभाव पाडू शकला नाही. त्यांची मजल पाच जागांपुरती मर्यादित राहिली, तर ओवेसी बंधूंच्या एमआयएमला खातेही खोलता आले नाही. तीन जागा अपक्षांना आणि एक समाजवादी पक्षाला मिळाली.

पंतप्रधान नरेंद्र मोदींचे मार्गदर्शन, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची रणनिती, मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांचे नेतृत्व, प्रदेशाध्यक्ष सी. आर. पाटील यांची संघटनात्मक बांधणी आणि पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी घेतलेली मेहनत यांचा परिपाक म्हणजे भाजपला गुजरातमध्ये अभूतपूर्व यश मिळाले, हे आवर्जून नमूद करावे लागेल.

आगामी लोकसभा निवडणूक २०२४मध्ये होणार आहे. चालू वर्ष सरायला काहीच दिवस उरले आहेत. नव्या वर्षापासून लोकसभा रणसंग्रामाची चाचपणी सुरू होईल. या पार्श्वभूमीवर भाजपने घरच्या मैदानावर बाजी मारून सज्ज असल्याचे दाखवून दिले आहे. भाजपचा हा देदीप्यमान विजय विरोधकांना चिंतन करायला लावणारा आहे.

**–समाधान पाटील, पनवेल**




## आमदार प्रशांत ठाकूर यांचे योगदान

गुजरात विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातून भाजपच्या ज्या नेत्यांवर वेगवेगळ्या मतदारसंघांमध्ये निवडणूक प्रभारी म्हणून जबाबदारी टाकण्यात आली होती त्यात पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष व पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांचाही समावेश होता. पक्षनेतृत्वाने दिलेली जबाबदारी चोख बजावत त्यांनी नवसारी जिल्ह्यातील गणदेवी विधानसभा मतदारसंघाचे भाजप उमेदवार तथा मंत्री नरेशभाई पटेल यांच्या विजयात मोलाचा हातभार लावला.

एकीकडे पनवेलमध्ये स्थानिक पातळीवरील निवडणुका होत असताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षनेतृत्वाचा आदेश शिरसावंद्य मानून गुजरातमधील गणदेवी मतदारसंघावर लक्ष केंद्रित केले होते. निवडक सहकाऱ्यांसह पनवेल येथून गुजरातमध्ये सातत्याने जात त्यांनी भाजप उमेदवार नरेशभाई पटेल यांचा नियोजनबद्ध प्रचार केला. मुख्यमंत्री म्हणून नरेंद्र मोदी यांनी गुजरातला मिळवून दिलेली नवी ओळख ते पंतप्रधानपदावर विराजमान होऊन देशाला कशी प्रतिष्ठा मिळवून दिली तसेच भाजपच पुन्हा सत्तेत का पाहिजे हे आमदार प्रशांत ठाकूर यांनी मतदारांना पटवून दिले. या निवडणुकीत मंत्री नरेशभाई पटेल सलग दुसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आले आहेत. मागील निवडणुकीत ते ५७ हजार २६१ मतांनी विजयी झाले होते. या वेळी त्यांच्या विजयाचे मताधिक्क्य तब्बल ९३ हजार १६६ एवढे आहे. याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर व संघटनेचे कौतुक होत आहे.

---



# समृद्धी महामार्ग महाराष्ट्राची भाग्यरेखा

**संपर्क, सातत्य व संवाद हा विकासाचा मूलमंत्र आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबई आणि उर्वरित प्रदेश यांच्यातील संपर्क, सातत्य, संवाद अधिक बळकट व गतिमान करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने योजनाबद्ध पावले उचलली आहेत. समृद्धी महामार्ग त्याचाच एक भाग. हा महामार्ग विदर्भ मराठवाड्यातील शेतकरी, सामान्य जनता, नव उद्यमी, लहान उद्योजक, व्यापाऱ्यांच्या महत्त्वाकांक्षांना पूर्ततेकडे नेणारा राजमार्ग आहे. हा प्रकल्प आता रविवारी लोकार्पित होणार असून विदर्भ, मराठवाड्यापासून मुंबईचे अंतर यामुळे लक्षणीयरित्या कमी होणार आहे. यानिमित्त हा विशेष लेख...**

महाराष्ट्राचा औद्योगिक विकास प्रामुख्याने मुंबई, पुणे, नाशिक या भागात अधिक झाला आहे, कारण या ठिकाणी मिळणाऱ्या प्राथमिक सुविधा व चांगल्या रस्त्यांचे जाळे. गुंतवणुकदारांनी मराठवाडा-विदर्भाकडे आगेकूच करण्यासाठी सुसाट वेगाची गरज असल्याचे लक्षात आले. त्यातून ७०० किलोमीटर लांबीच्या या महामार्गाचा जन्म झाला. ४ डिसेंबरला जेव्हा या रस्त्याची पाहणी करायला विद्यमान मुख्यमंत्री व तत्कालीन नगरविकासमंत्री व सार्वजनिक बांधकाम (उपक्रम) मंत्री एकनाथ शिंदे आणि तत्कालीन मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रत्यक्ष समृद्धी महामार्गावर उतरले, त्या वेळी दोघांच्या आनंदाला पारावार नव्हता. हा आनंद कर्तव्यपूर्तीचा होता, मनातली स्वप्न प्रत्यक्ष पूर्ण होताना पाहण्याचा होता.

### वेदनेची कोंडी फोडणारा मार्ग

नागपूर, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, यवतमाळ या भागांतून मुंबईला पोहोचण्यासाठी दोन-दोन दिवसांचा कालावधी लागल्याच्या आठवणी आता जुन्या झाल्या आहेत. नागपूरवरून दिल्ली काय आणि मुंबई काय सारखेच, पण राज्य कारभार चालणारे स्थळ मात्र मुंबई...

विदर्भात कापूस, सोयाबीन, कडधान्य, तेलबियांचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात होते, मात्र सर्व कारखानदारी मुंबई, पुण्याकडे. महाराष्ट्रातील सर्वांत जास्त खनिजसंपदा असणारा प्रदेश चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ व आसपासचा परिसर, मात्र, खनिजावर आधारित कारखानदारी एक हजार किलोमीटरवर. पूर्व विदर्भात मोठमोठ्या नद्या, हजारो मामा तलाव. त्यातून गोड्या पाण्यातील मासळीचे मध्य भारतातील सर्वात अधिक उत्पन्न विदर्भात, मात्र ताज्या मासळीच्या निर्यातीला जवळचे रस्ते नाहीत. विदर्भातील तरुणाईचे, सुशिक्षितांचे, शेतकऱ्यांचे हे दुःख समजून तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या दूरदृष्टीच्या नेत्याने या महामार्गाची कल्पना मांडली व विद्यमान द्रष्टे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ती पूर्णत्वास नेण्यासाठी पूर्ण पाठबळ दिले. अशा कितीतरी दुःखांवर फुंकर घालण्याची ताकद या समृद्धी मार्गात आहे.

### डोळ्यांत भरणारी समृद्धी

समृद्धी महामार्गाच्या वैशिष्ट्यातच विकासाचा मूलमंत्र आहे. १४ ते १६ तास मुंबईपर्यंत पोहचण्याला लागणाऱ्या काळामध्ये या सर्वांत जवळच्या मार्गाने सात ते आठ तासांत मुंबईला पोहचता येणार आहे. कच्चा माल, खनिज, दूध, मासळी, शेतमाल या मार्गाने मुंबईसारख्या मोठ्या बाजारपेठेत लवकरात लवकर पोहचणार आहे. त्यामुळे समृद्धी मार्ग महाराष्ट्राची खऱ्या अर्थाने भाग्यरेखा ठरणार आहे.

७०१ किलोमीटरची विस्तीर्ण लांबी, सहा मार्गिकांसह १२० मीटरची डोळ्यांत भरणारी रुंदी, वाहन गतीने चालवण्यासाठी प्रत्येक मार्गिकेची आखणी, कुणी मध्येच येणार नाही याची शाश्वती देणारे सुरक्षा कठडे, त्यामुळे काही क्षणांत डोळ्यासमोरून गतीने वाहन दिसेनासे होणे ही आता समृद्धी महामार्गाची ओळख होईल. समृद्धी महामार्गाच्या पाहणीच्या निमित्ताने नुकतेच हे दृश्य बघायला मिळाले. प्रत्यक्षात जेव्हा ताफ्यामध्ये वाहने धावायला लागली तेव्हा स्पीडोमीटरच रस्त्याच्या प्रेमात पडते की काय असे वाटायला लागले. रस्त्यांची रुंदी, प्रत्येक मार्गिकेची आखणी, दर्जा, सजावट, दिशादर्शक फलके, सुरक्षा मानके, नजरेत भरत होती.

नागपूर आणि विदर्भाला राजधानी मुंबईच्या जवळ नेणारा हा महामार्ग मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या स्वप्नांना मूर्त रूप देणारा ठरणार आहे. आता प्रतीक्षा आहे या स्वप्नपूर्तीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लोकार्पणाची मोहोर उमटविण्याची.

**–प्रवीण टाके,**
**जिल्हा माहिती अधिकारी, नागपूर**

# रक्तदानात अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सहभाग

## नवी मुंबई महापालिकेतर्फे विशेष शिबिर



**नवी मुंबई : बातमीदार**

कोणत्याही व्यक्तीच्या अडचणीच्या प्रसंगात त्याला भासणारी रक्ताची गरज पुरविण्यासाठी रक्तदानाइतके श्रेष्ठ दान नाही हे लक्षात घेऊन नवी मुंबई महापालिकेच्या ८३ अधिकारी, कर्मचारी यांनी महापालिका मुख्यालयात आयोजित विशेष रक्तदान शिबिरामध्ये स्वयंस्फूर्तीने रक्तदान करीत इतरांसमोर एक उत्तम आदर्श ठेवला. यामध्ये ७५ पुरुष व आठ महिलांनी रक्तदान केले. विशेष म्हणजे महापालिका मुख्यालयात विविध कामांसाठी भेट देणाऱ्या चार नागरिकांनीही यामध्ये स्वइच्छेने सहभागी होऊन रक्तदान केले.

नवी मुंबई महापालिकेची वाशी सार्वजनिक रुग्णालयात स्वत:ची रक्तपेढी असून त्यामधून इच्छुक रक्तदात्यांना आवश्यकतेनुसार रक्ताचा पुरवठा करण्यात येत असतो. या रक्तपेढीमधील रक्तसाठ्यात वाढ व्हावी व नमुंमपा अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये असलेली रक्तदानाव्दारे सामाजिक बांधिलकी जपण्याची इच्छा लक्षात घेऊन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महापालिका रक्तपेढीच्या वतीने सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत विशेष रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

नवी मुंबई महापालिकेच्या रुग्णालयांमधील आरोग्य सुविधांमध्ये वाढ झालेली आहे. या अनुषंगाने विविध प्रकारच्या आजारांवरील उपचारांसाठी अथवा शस्त्रक्रियांप्रसंगी रक्ताची गरज वाढली असून त्या दृष्टीने नवी मुंबई महापालिका वाशी सार्वजनिक रुग्णालयातील माँसाहेब मिनाताई ठाकरे रक्तपेढीमार्फत विविध ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येत असते. अशाच प्रकारचे रक्तदान शिबिर नवी मुंबई महापालिका मुख्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांच्यामधील इच्छुक रक्तदात्यांसाठी करण्यात आले होते.

रक्ताच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व अनन्यसाधारण असून त्यामुळे एखाद्याचा जीव वाचू शकतो, असे सर्वश्रेष्ठ रक्तदान करणाऱ्या या रक्तदात्यांना नवी मुंबई महापालिका रक्तपेढी यांचे प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात आले.

आरोग्य विभागामार्फत महापालिका मुख्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरासाठी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनानुसार, अतिरिक्त आयुक्त संजय काकडे यांच्या नियंत्रणाखाली वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद पाटील, नवी मुंबई महापालिका वाशी रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रशांत जवादे, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. प्रिती संघानी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

ज्या व्यक्ती अथवा संस्था यांना आपल्या सोसायटी, संस्थेमध्ये अशाप्रकारे रक्तदान शिबिरांचे आयोजन करू इच्छितात त्यांनी ०२२-२७८८८७५० क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे. शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष खासदार डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशनच्या मागणीने हे शिबिर पार पडले. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशनच्या वतीने वैभव जाधव, चेतन पाटील, विशाल जाधव, चैतन्य काळे तसेच नवी मुंबई जिल्हाप्रमुख सोमेश्वर बडे, उपजिल्हाप्रमुख सतीश शिंदे, प्रमोद सावंत आदी उपस्थित होते.

### रक्तसाठा वाढविण्यावर भर

**नवी मुंबई महापालिका रक्तपेढीच्या वतीने विविध स्वयंसेवी संस्थांची मदत घेऊन ठिकठिकाणी रक्तदानाची शिबिरे आयोजित केली जात आहेत. या माध्यमातून रक्ताची जाणवणारी कमतरता दूर करून रक्तसाठा वाढविण्यावर भर दिला जात आहे. त्यामध्ये महापालिका अधिकारी, कर्मचारी यांनीही रक्तदानासाठी पुढाकार घेत समाजासमोर चांगला आदर्श ठेवला असून यापुढील काळात जागेच्या उपलब्धतेनुसार महापालिका विभाग कार्यालयांमध्येही अशा प्रकारे रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.**

## भाजपचे विजय भोईर यांच्या प्रयत्नाला यश

# मयत कामगाराच्या कुटुंबीयांना मिळाला न्याय

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील बोकडविरा येथील वायू विद्युत निर्मिती केंद्रात ९ ऑक्टोबर २०२२ रोजी झालेल्या बॉयलरच्या भीषण स्फोटात सहाय्यक अभियंत्यासह तीन कामगारांचा मृत्यू झाला. यातील मयत कुंदन पाटील यांच्या कुटुंबीयांना पेन्शन व इतर सुविधा मिळाल्या आहेत. या कामी भाजप नेते तथा माजी जि. प. सदस्य विजय भोईर यांच्या पाठपुरावा केला होता.

भीषण स्फोटात विवेक धुमाळे याचा हायप्रेशरच्या वाफेच्या होरपळून जागीच मृत्यू झाला. बोकडविरा येथील दुसरा कामगार विष्णू पाटील हा नवी मुंबई येथील रुग्णालयात उपचार घेत असताना मरण पावला. तर डोंगरी येथील रहिवासी असलेला तिसरा कामगार कुंदन पाटील अत्यवस्थ असल्याने तीन दिवस उपचार घेत असतांना नवी मुंबई रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत असतांना त्याची प्राणज्योत मालवली.

या वायू विद्युत केंद्राच्या दुर्घटनेतील एका सहाय्यक अभियंत्यासह तीन कामगारांना त्यांचा काहीही दोष नसतांना जीवाला मुकावे लागले होते. सोमवारी १० ऑक्टोबर २०२२ रोजी रात्री कामगार विष्णू पाटील यांचा मृतदेह वायू विद्युत निर्मिती केंद्राच्या प्रवेशद्वाजवळ आणण्यात आला होता. व्यस्थापणाने मृत कामगारांच्या वारसांच्या भविष्यासाठी त्यांचा न्याय हक्क त्यांना मिळावा या मागणीसाठी प्रयत्न केले, मात्र निर्धास्त असलेल्या प्रशासन अधिकाऱ्यांनी मृत कामगारांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याऐवजी सरकारी नियमांचे पाढे वाचण्याशिवाय विशेष काही मदत देण्यावर भर दिलाच नाही. त्यावेळी मयत व्यक्तीच्या उपचाराचा खर्च एक लाख २५ हजार रुपये हा विजय भोईर यांनी स्वतःच्या खिशातून देऊन मयत व्यक्तीच्या कुटुंबाला तातडीने मदत केली. एकंदरीत प्रकल्पातील दुर्घटना ही हलगर्जीपणातून झाली असल्याचे स्पष्ट झाले होते. विजय भोईर यांनी बोकडवीरा येथील मयत कामगार विष्णू पाटील यांना न्याय मिळवून देण्यासाठी सुरुवातीपासूनच पाठपुरावा सुरू ठेवला होता. विजय भोईर यांच्या प्रयत्नांना आता यश आले असून विजय भोईर यांच्या माध्यमातून मयत विष्णू पाटील यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळाला आहे.

विजय भोईर यांच्या पाठपुराव्यामुळे शासनाकडुन पाटील कुटुंबीयांना पेन्शन व इतर सुविधा मिळाल्या आहेत. तसे आदेशसुद्धा प्रशासनाकडून देण्यात आलेले आहेत. इएसआय विभागाकडून मयत विष्णू पाटील यांच्या कुटुंबाला १०३२२ रुपये प्रति महिना पेन्शन मंजूर झाली आहे. पेन्शन त्यांच्या पत्नीला पुढील संपूर्ण आयुष्यभरासाठी मिळणार आहे.

यासाठी विजय भोईर यांनी जातीने पाठपुरावा करून कागदपत्रांची वेळेस पूर्तता केल्यामुळे कामगार राज्य विमा योजना विभागातील अधिकाऱ्यांनी त्याची तातडीने दखल घेऊन जीटीपीएस येथे घटनास्थळी भेट देऊन पुढील कारवाई केली. विजय भोईर यांच्या तत्परतेमुळे मयत कामगाराच्या नातेवाईकांना तातडीने पेन्शन भेटून दिल्यामुळे विजय भोईर यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे, तसेच त्यांचे भविष्य निर्वाह निधीचे पैसे आणि भविष्य निर्वाह निधीचा विम्याचे पैसे मिळवण्यासाठी पुढील पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन विजय भोईर यांनी दिले आहे.

# पोलीस महिलेची आत्महत्या

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

माझ्या आत्महत्येस कोणालाही जबाबदार धरू नका माझ्या आत्महत्येस कोणालाही जबाबदार धरू नका अशी चिठ्ठी लिहून पोलीस दलात कार्यरत असलेल्या एका महिलेने गळफास घेत आत्महत्या केली आहे. स्नेहा थोरात असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव असून मुंबई पोलीस आयुक्तालय येथे त्या कार्यरत होत्या.

स्नेहा या सुमारे पाच वर्षांपासून नवी मुंबईतील कोपरखैरणे सेक्टर ५ येथे भाड्याच्या घरात राहत होत्या. तर त्यांचा भाऊ स्वप्नील मोरे हा याच परिसरात राहत आहे. गुरुवारी त्याने स्नेहा यांना अनेकदा फोन केला मात्र प्रतिसाद न दिल्याने त्यांनी स्नेहा यांचे घर गाठले. दरवाजाची कडी व बेल अनेकदा वाजवली तरीही आतून प्रतिसाद न मिळाल्याने दरवाजा तोडून आत प्रवेश केला. त्या वेळी स्नेहा यांनी नायलॉन दोरी सिलिंग फॅनला बांधून गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्या. याबाबत पोलीस घटनास्थळी आले व स्नेहा यांचा मृतदेह ताब्यात घेत पुढील तपासणीसाठी मनपा रुग्णालयात दाखल केला.

स्नेहा यांनी आत्महत्या करण्यापूर्वी लिहलेल्या चिठ्ठीत आपल्या आत्महत्येस कोणाला जबाबदार धरू नये असे नमूद करण्यात आले होते. स्नेहा या २०१४च्या बॅचच्या आहेत. त्याची आत्महत्या ही दुर्दैवी घटना आहे. नैराश्यापोटी आत्महत्या हे उघड आहे. आत्महत्येस कोणालाही जबाबदार धरू नये असे लिहले असले तरी घटनेचा तपास आम्ही करीत आहोत, अशी माहिती पोलीस निरीक्षक गजानन कदम यांनी दिली.

# प्रसाद देण्याच्या बहाण्याने मुलीवर अत्याचार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सूकापूर येथील एका इमारतीमध्ये ६० वर्षीय व्यक्तीने देवाचा प्रसाद देण्याच्या बहाण्याने एका ११ वर्षीय बालिकेवर अत्याचर केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पीडित बालिकेच्या वडिलांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर या प्रकरणातील संशयित आरोपी विश्वनाथ गिते याला अटक करण्यात आली आहे.

पीडित बालिका व गिते यांच्या घरातली नातवंडे एकत्र यापूर्वी खेळत होते. तीन दिवसांपूर्वी ज्या वेळी ही घटना घडली त्या वेळेस गीते यांनी इमारतीमधील सर्वांना घरी जाऊन प्रसाद दिला, मात्र पीडित बालिकेला स्वत:च्या खोलीत कोणीही नसताना एकांतात नेले आणि तिच्यावर अत्याचार केला.



या प्रकाराने धक्का बसल्याने पीडित बालिका हादरुन गेली. तिने याबाबत पहिल्यांदा कोणालाही काही सांगीतले नाही, मात्र ती गप्प व नाराज बसल्याने तिच्या आईला संशय आला. आजोबांनी अशी विकृती केल्याचे पीडित बालिकेने सांगितल्याने पालकांनी खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सुभाष कोकाटे यांच्याशी संपर्क साधला. पोलिसांनी तातडीने गीते याला अटक केली.

गीतेवर विनयभंग, बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल केला. न्यायालयासमोर ६० वर्षीय गिते याला हजर केल्यानंतर त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. सध्या खांदेश्वर पोलीस हे गीते याने यापूर्वी काही अश्लिल चाळे केले का याची चौकशी करीत आहेत.

# गरजेपोटी घरे कायम करण्यासाठी दरात कपात; भूमिपुत्रांना दिलासा

**नवी मुंबई : बातमीदार**

गेल्या ३५ वर्षांपासून प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेल्या घरांना कायम करण्या संदर्भात सातत्याने मागणी केली जात होती. गेल्या अनेक वर्षांपासून प्रकल्पग्रस्तांच्या गरजेपोटी बांधलेल्या घरांना कायम करावे ही मागणी सातत्त्याने जोर असताना गेली चाळीस वर्षे शासन दरबारी हे भिजत घोंगडे पडले होते, परंतु नवी मुंबई महापालिकेचे माजी आयुक्त आणि बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे उपनेते विजय नाहटा यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रमुख विजय चौगुले, उपजिल्हा प्रमुख शिवराम पाटील, रोहिदास पाटील, किशोर पाटकर यांच्या पाठपुराव्यामुळे महाराष्ट्राचे लोकप्रियब मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रकल्पग्रस्त बांधवांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न निकाली काढला आहे.

गरजेपोटी बांधलेल्या घरांना कायम करण्याचा शिंदे, फडणवीस सरकारने निर्णय घेतला असून गरजेपोटी बांधलेल्या घरांना कायम करण्याची घोषणा केली आहे. मागील २५ फेब्रुवारी २०२२ रोजी तत्कालीन नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी सानपाडा येथे पत्रकार परिषद घेऊन प्रकल्पग्रस्तांची घरे कायम करण्याचा शासन निर्णय जाहीर केला होता, परंतु त्यावेळी जाहीर केलेला प्रति चौरस मीटरचा दर ० ते २५० चौ. मिटरला ३० टक्के आणि २५१ ते ५०० चौ. मिटरला ६० टक्के असा दर लावण्यात आला होता. त्यामुळे दर जास्त असल्याची भावना स्थानिक भूमिपुत्रांनी व्यक्त करून नाराजी दर्शविली होती. जनभावनेचा विचार करून विजय नाहाटा यांनी प्राप्त परिस्थिती विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कानावर घालून क्षेत्रफळाच्या दरात कपात करण्याची मागणी केली होती. जास्त दर भरणे भूमिपुत्रांना शक्य नसल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लेखी निवेदनाद्वारे कळवून दर कमी करण्याची मागणी करून सातत्याने पाठपुरावा केला होती. गेल्या अनेक वर्षा पासून होत असलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या मागणीचा आदर करून त्यांना दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धोरणात्मक शासन निर्णय जाहीर केला आहे त्यात प्रकल्पग्रस्त नागरिकांनी गरजेपोटी बांधलेल्या घरांना कायम करून ० ते २५० चौ. फूट क्षेत्रफळाला प्रचलित सिडकोच्या राखीव दराच्या प्रमाणात ३० टक्के ऐवजी १५ टक्के आणि २५१ ते ५०० चौ. फूट. क्षेत्रफळाला ६० टक्क्यांऐवजी २५ टक्के दर लागू करण्यात आले आहेत.

शासनाच्या या धोरणात्मक निर्णयामुळे नवी ठाणे, नवी मुंबई, रायगड येथील परिसरातील स्थानिक प्रकलग्रस्त बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. स्थानिक भूमिपुत्रांनी महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच बाळासाहेबांची शिवसेनेचे उपनेते विजय नाहटा व जिल्हा प्रमुख विजय चौगुले यांचे आभार व्यक्त केले आहेत.

### पनवेल, उरणमधील प्रकल्पग्रस्तांनाही फायदा

**भूमिपुत्रांच्या अडचणींची जाणीव मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठेवत उपनेते विजय नाहटा व जिल्हा प्रमुख विजय चौगुले यांच्याशी चर्चा करून आर.पी.दरात कपात केल्याची घोषणा केली आहे. त्याचा फायदा नवी मुंबईसह, पनवेल उरणमधील प्रकल्पग्रस्तांना होणार आहे.**

# सीकेटी विद्यालयातील हर्षल बोरसे वक्तृत्व स्पर्धेत प्रथम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये खासदार शरद पवार यांच्या ८२व्या वाढदिवसानिमित्त विभागीय स्तरावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेनिमित्त रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, आमदार बाळाराम पाटील, जे. एम. म्हात्रे, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, महेंद्र घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत आदी उपस्थित होते.

सीकेटी विद्यालयातील हर्षल किशोर बोरसे हिने इयत्ता सातवी भाषा हिंदी प्रथम क्रमांक पटकावला. तीन हजार रुपये व ट्रॉफी देऊन मान्यवरांच्या हस्ते तिचा गौरव करण्यात आला.

हर्षलचे सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. तसेच मार्गदर्शक शिक्षिका शशिकला पाटील यांनी सहभागी मुलांना योग्य ते मागदर्शक करून व त्यांच्याकडून चांगली तयारी करून घेतली होती आणि त्यांच्याच मेहनतीचे फळ म्हणून हर्षल वकृत्व स्पर्धेमध्ये प्रथम आली, असे या वेळी मुख्याध्यापकांनी सांगितले.

या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, सहसचिव भाऊसाहेब थोरात, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# एपीएमसीत आरोग्यदायी कृष्ण कमळ फळाची आवक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

तुर्भे येथील एपीएमसी फळ मार्केटमध्ये कृष्ण कमळ फळाची (पॅशन फ्रूट) आवक सुरू झाली आहे. याचा वापर ज्यूस, कॉकटेल, सिरप, जॅम आणि जेली तयार करण्यासाठी करण्यात येतो. तसेच या फळांमध्ये फॉस्फरस, प्रोटिन, आयर्न, सोडियम तसेच व्हिटॅमिनचा समावेश असल्याने आरोग्याच्या दृष्टीनेदेखील महत्त्व आहे.

दक्षिणोत्तर प्रदेशामध्ये येणाऱ्या या फळाबाबत पॅशन फ्रूटची महाराष्ट्रात कमी जणांना माहिती आहे. वेगवेगळ्या स्वरूपात या फळाचा वापर घराघरात आवडीने केला जातो. जुलै, ऑगस्ट महिन्यात वेलीला या फळाची फुले येतात. अतिशय सुंदर दिसणारे हे फ्रुट 'कृष्णकमळ' या नावानेदेखील ओळखले जाते. पंजाब व हिमाचल प्रदेशात यांची लागवड होते. पॅशन फ्रूट वेलीला येत असल्याने जागाही कमी लागते. त्यामुळे गच्चीवरही ही वेल लावली जाते. सध्या एपीएमसी बाजारात साधारण १०० ते २०० बॉक्सची आवक झाली असून ३०० ते ४०० रुपयांना विक्री होत आहे. मधुमेह, कॅन्सर, उच्च रक्तदाब आणि मूत्राशयाच्या विकारांवर हे फळ उपयोगी असल्याने त्याला मागणी असल्याचे व्यापाऱ्याने सांगितले.

# पर्यटक फ्लेमिंगो बोटिंगच्या प्रतीक्षेत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई शहराला लाभलेला खाडी किनार आणि जैवविविधता यांची महिती उपलब्ध होण्यासाठी ऐरोलीमध्ये किनारी आणि सागरी जैवविविधता निसर्ग परिचय केंद्र उभारण्यात आले आहे. पक्षप्रेमींना फ्लेमिंगो पक्षी पाहता यावे त्यासाठी या परिसरात बोटिंगची सुविधा उपलब्ध आहे, परंतु या केंद्रात अद्याप फ्लेमिंगो दाखल झाले असली तरी बोटिंग सुरू करण्यात आलेली नाही. बेलापूरमध्ये पहिल्यांदा नव्याने फ्लेमिंगो बोट २ डिसेंबरपासून सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे पर्यटक ऐरोली येथील बोटींग सफरीच्या प्रतीक्षेत आहेत.

नवी मुंबईसह, ठाणे, मुंबईतील पर्यावरण प्रेमींना खाडी किनाऱ्यांचे महत्त्व कळावे तसेच जैवविविधतेची माहिती व किनाऱ्यांचे संरक्षण कसे करावे याबाबत माहिती मिळावी म्हणून पक्षीनिरक्षण आणि बोटींग सुरू करण्यात आली आहे. ठाणे ही आशिया खंडातील सर्वांत मोठी खाडी आहे. २६ किलोमीटरच्या खाडी परिसरामध्ये २०० पेक्षा जास्त पक्षी स्थलांतर करीत असतात. फ्लेमिंगोसह अनेक विदेशी पक्षीही खाडी किनाऱ्यावर प्रत्येक वर्षी आश्रयाला येतात. बोटीने खाडीकिनारी सफर ही नोव्हेंबर महिन्यात सुरू होणे अपेक्षित होते, परंतु अद्याप थंडीचा मौसम कमी असल्याने फ्लेमिंगोचे आगमन उशिराने झाले आहे, परंतु ऐरोली येथील बोटिंग सफर अद्याप सुरू झाली नसून बेलापूर येथे बोटिंग सुरू आहे. त्यामुळे पर्यटक लवकर बोटिंग सफर सुरू होण्याच्या प्रतीक्षेत पर्यटक आहेत.

ऐरोली खाडीकिनारी फ्लेमिंगो दाखल झाले आहेत बोटिंग सफर सुरू करण्याबाबत पाठपुरावा सुरू असून पुढील परवानगीसाठी प्रलंबित आहे लवकरच सुरू होण्याची अपेक्षा आहे, अशी माहिती ऐरोली सागरी जैवविविधता केंद्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत बहादुरे यांनी दिली.



## निवडक

### पेट्रोल पंपाच्या कार्यालयात चोरी

**पनवेल :** भिंगारी येथील ज्वाला हायवे सर्व्हिस एचपीसीएल, पेट्रोलपंपच्या कॅबिनमधून ४९ हजारांची चोरी झाल्याची घटना घडली आहे. यासंदर्भात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पंकज धर्मराज दुबे यांच्या मालकीच्या जो ज्वाला हायवे सर्व्हिस, एचपीसीएल पेट्रोलपंप, भिंगारी येथील कॅबिनमधून एका अनोळखी व्यक्तीने २५ हजार रोख रक्कम, की-पॅड मोबाईल, महागडा पेन व इतर कागदपत्रांसह ४९ किमतीचा ऐवज चोरून नेला. यासंदर्भात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पेट्रोलपंपमधील सीसीटिव्हीच्या सहाय्याने आरोपीचा शोध घेत आहेत.

### एक्स्प्रेसमधून दागिन्यांची चोरी

**पनवेल :** रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिलेच्या बॅगमधून सहा लाखांचे दागिने चोरल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बोरिवली येथे राहणाऱ्या माधुरी गवस (वय ६०) या मुंबईत त्यांच्या मैत्रिणीच्या मुलाच्या लग्नाचे रिसेप्शनसाठी कोकणकन्या एक्स्प्रेसने मुंबईला येत होत्या. या वेळी लग्नात वापरण्यासाठी त्यांनी सोन्याचे मौल्यवान दागिने सोबत आणले होते. त्यांची रेल्वे पनवेल स्थानकात पोहचली असता त्यांना त्यांच्या बॅगची चेन उघडी आढळून आली. बॅग तपासल्यावर दागिन्यांची पर्स आढळली नाही. याप्रकरणी पनवेल रेल्वे पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# विदेशी मद्याची वाहतूक करणारे ताब्यात



## ■ पाऊण लाखाहून अधिक किमतीचा मुद्देमाल हस्तगत
## ■ रेल्वे, उत्पादन शुल्क, स्थानिक पोलिसांची संयुक्त कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

रेल्वे पोलीस प्रशासन व निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पनवेल शहर, यांनी संयुक्तपणे केलेल्या कारवाईमध्ये पनवेल रेल्वे स्थानकातून तीन व्यक्तींना मद्यासह ताब्यात घेतले. त्यांच्याकडून परराज्यातील विदेशी मद्याचा व बिअरचा ९६ हजार ३२० रुपये किमतीचा दारूबंदी गुन्ह्याचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुनित विश्वनाथ खंडागळे, (वय ३४ वर्षे, उधना सुरत), राजन कुमार रामनाथ सिंग, (वय ४० वर्षे, चौरिआसी, जि. सुरत), गुलाम फरीद मोहम्मद शरीफ शेख, (वय ३० वर्षे चौरिआसी, जि. सुरत) अशी तिघांची नावे आहेत.

राज्य उत्पादन शुल्क, रायगड अलिबाग यांच्या मार्गदर्शनाखाली संजय पुरळकर, निरीक्षक, पनवेल शहर, शिवाजी गायकवाड, प्रमोद कांबळे, दुय्यम निरीक्षक, व स्टाफ सुभाष जाधव, विलास चव्हाण, सुधीर मोरे, जवान तसेच महिला जवान रमा कांबळे, यांना जसबीर राणा, निरीक्षक, रेल्वे सुरक्षा बल, पनवेल तसेच एस. एम. कोटवाल, निरीक्षक यांच्यासह पनवेल रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्र. ५ वर उभ्या असलेल्या गोवा संपर्कक्रांती एक्सप्रेसमधील जनरल कोच जी एस-१ची दारूबंदी कायद्यांतर्गत झडती घेतली. या ठिकाणी तीन व्यक्ती व त्यांच्या ताब्यात नऊ बॅग व दोन मोठ्या आकाराच्या पिशव्यांसह ते संशयितरित्या बसलेले दिसून आले. त्यांच्याकडे बॅगांबाबत चौकशी केली असता त्यांनी या बॅगा त्यांच्या असल्याचे सांगितले. त्यांनी ते गोवा येथून आले असल्याचे व सुरत, गुजरात येथे जात असल्याचे सांगितले.

या बॅगांमध्ये गोवा बनावटीची दारू असून ती ते विक्रीच्या उद्देशाने घेवून जात असल्याचे सांगितले. बॅगांमध्ये विविध ब्रँडच्या व विविध परिमाणाच्या गोवा बनावटीच्या विदेशी मद्याच्या सिलबंद बाटल्या तसेच बिअरचे पत्र्याचे सिलबंद टिन असल्याचे व सर्व प्रकारच्या मद्याच्या व बिअरच्या टिनवर फक्त गोवा राज्य विक्रीकरिता असा मजकूर निदर्शनास आले. तीन व्यक्तींच्या ताब्यातून परराज्यातील विदेशी मद्याचा व बिअरचा ९६ हजार ३२० इतक्या किमतीचा दारूबंदी गुन्ह्याचा मुद्देमाल मिळून आला. गुन्ह्याचा पुढील तपास शिवाजी गायकवाड, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पनवेल शहर - १, करीत आहेत.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून विद्यार्थ्यांचे कौतुक

(छाया : चेतन पोपेटा)



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ पब्लीक स्कूल सीबीएसईमध्ये विज्ञान आणि कला प्रदर्शनाचे आयोजन शनिवारी (दि. १०) करण्यात आले होते. या प्रदर्शनाला रयतचे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत विद्यार्थ्यांनी बनवलेल्या कलाकृतींची पाहणी केली व कौतुक केले.

या प्रदर्शनात ८० विज्ञान प्रकल्प, ८०० चित्र आणि टाकाऊ वस्तूंपासून बनवलेल्या टिकाऊ वस्तूंचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. या विज्ञान प्रकल्पात पर्यावरण संरक्षण, हरित ऊर्जा, सौरऊर्जा, तंत्रज्ञान, जैवविविधता यांवर भर देण्यात आला होता. या प्रदर्शनाचे वैशिष्ट्ये हे होते की यातील प्रकल्पू विद्यार्थ्यांनी स्वत: तयार केले होते. त्यांना मार्गदर्शन त्यांचे विज्ञानाचे शिक्षक व पालक यांनी केले. प्रदर्शनाची पाहणी करताना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आजचे छोटे शास्त्रज्ञ उद्या भारतात संशोधन करून मोठे शास्त्रज्ञ होतील, अशी इच्छा व्यक्त केली.

या वेळी 'रयत'चे इन्सपेक्टर रोहिदास ठाकूर, अॅड. आशा भगत, प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे, पालक शिक्षक संघाचे सदस्य कुलदिप त्रिपाठी, काशिद सर, सोनल सक्सेना, अर्चना यादव यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.



**खारघर : रामप्रहर वृत्त**


जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये विज्ञान व गणित रोबेटीक विषयावरच्या प्रकल्पांचे प्रदर्शन शनिवारी (दि. १०) भरविण्यात आले होते. हे प्रदर्शन रोबेटीक आणि गणित या विषयातील तंत्रज्ञानावर आधारित होते. या प्रदर्शनाला संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट विद्यार्थ्यांना बनवलेल्या प्रकल्पांची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

या प्रदर्शनाचे विशेष आकर्षण म्हणजे शाळेतील मुलांनी बनविलेला रोबोट, हा रोबोट २० फूट उंच तसेच मान आणि हात हलवून सर्वांचे स्वागत करीत होता. तसेच मुलांसाठी पालकांसाठी एक रोबोटचा सेल्फी पॉईंट बनविला होता ते सर्वांचे आकर्षण होते. तसेच या प्रदर्शनात ६३७ प्रकल्प ठेवण्यात आलेले होते. व १८ रोबोटिक विषयावर प्रकल्प होते. रोबोटिक मध्ये ऑटोमेटिक स्मार्टकार, स्मार्ट गॉगल्स, बास्केटबॉल, काउंटर, स्मार्टकेन, फिगर प्रिंटलॉक, रो-बोट, ऑटोमेटिक डोर अलार्म हे सर्व प्रकल्प प्रदर्शनात सादर करण्यात आले होते तसेच या प्रदर्शनाचे मुलांनी स्वतः बनविलेल्या ड्रोन कॅमेराद्वारे आपल्या सर्व प्रदर्शनाचे शूटिंग करण्यात आले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्रकल्पांची पाहणी केली या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. प्रदर्शनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना, तसेच उत्कृष्ट प्रकल्पांना पारितोषिके व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.



कामोठे : रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या ८२व्या वाढदिवसानिमित्त कृतज्ञता सप्ताहाचे आयोजन न्यू इंग्लिश स्कूलमध्ये करण्यात आले होते. या सप्ताहांतर्गत स्कूलमध्ये सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल अॅण्ड ज्युनिअर कॉलेजची शिफा राजरियान शिकलगार हिने गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. त्याबद्दल 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून कौतुक केले. या वेळी रायगड विभागाचे 'रयत'चे इन्स्पेक्टर रोहिदास ठाकूर, प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.



पनवेल : महापालिका स्वच्छ सर्वेक्षण २०२२-२३ अंतर्गत टॉयलेट २.० या उपक्रमांतर्गत गणेशवाडी, लोकमान्यनगर येथे सार्वजनिक शौचालय स्वच्छता मोहीम व सुशोभीकरण रांगोळी, रंगरगोटी करण्यात आले. प्रभाग क्रमांक १७चे स्वच्छता निरीक्षक अनिकेत अनिल जाधव, स्वच्छता पर्यवेक्षक रमेश गरुडे, सामाजिक कार्यकर्ते अशोक आंबेकर, अंकुश पाटील, जयराज भोईर, स्वच्छता कर्मचारी आदींच्या उपस्थितीत हे सुशोभीकरण झाले.



पनवेल : तळोजा येथील एका घरात बंद पडलेला एसी दुरुस्त करण्यासाठी आलेल्या व्यक्तीने पाच वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी आरोपी अख्तर हुसेन (वय १९) याला पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान, या घटनेची तत्काळ दखल घेत महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल आणि भाजप महिला मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी पीडित मुलीच्या कुटुंबीयांना धीर दिला तसेच पोलीस ठाण्याला भेट देऊन आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

# सीकेटी विद्यालयात व्याख्यानमाला



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत (एनएसएस) शुक्रवारी (दि. ९) व्याख्यानमाला पुष्प चौथे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. वाचन संस्कृती व कविता कशी करावी? हा उपक्रमाचा विषय होता.

या उपक्रमास मराठी साहित्य मंडळ, रायगडचे अध्यक्ष राजेश थळकर, उपजिल्हाध्यक्ष पांडुरंग जाधव हे प्रमुख व्याख्याते लाभले होते. राजेश खळकर यांनी आपल्या व्याख्यानातून वाचनाची महती विशद केली. वाचनालयात जा रोज नियमित वाचन करा असे सांगत त्यांनी विविध पौराणिक व ऐतिहासिक दाखले दिले. वाचनाची शिदोरी तुम्हास शेवटपर्यंत साथ देईल असा उपदेशही त्यांनी विद्यार्थ्यांना केला.

उपक्रमाचे दुसरे व्याख्याते पांडुरंग जाधव यांनी कविता कशी करावी? तिच्यातील बारकावे तिची उद्दिष्टे याचे विवेचन कविता सादर करून स्पष्ट केले. कवितेची नेमकी व्याख्या करता येत नाही कारण ती ईश्वराप्रमाणे निराकार आहे, असे आग्रही प्रतिपादन त्यांनी केले.

या उपक्रमात विद्यालयातील सहाय्यक शिक्षक दिलीप पाटील व योगिता जोरी यांनी आपापल्या कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी अपेक्षा शेळके, ध्वनी सावंत, तनिषा मोरे यांनी उत्स्फूर्तपणे कविता सादर केल्या मान्यवरांनी या विद्यार्थ्यांना पुस्तके भेट देऊन त्यांचा गौरव केला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य प्रशांत मोरे सर व पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. एनएसएस युनिटचे कार्यक्रम अधिकारी विवेक पाटील, गणेश पाटील, संगीता देशमुख यांनी या कार्यक्रमाचे सुंदर आयोजन केले.

या कार्यक्रमात भावेश लोंढे व पांडुरंग जाधव यांना राजेश थळकर यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे निवेदन ध्वनी सावंत हिने तर व्याख्यात्यांचा परिचय रिध्दी पालांडे, मनाली कावळे, नेहल पाटील यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रवण कदम यांने केले तर तनिषा मोरे हिने उपस्थितांचे आभार मानले.

## शीव-पनवेल महामार्ग उजळणार

**पनवेल : वार्ताहर**

खारघर शीव-पनवेल महामार्गावरील खारघर ते कळंबोली मार्गावरील पथदिवे अनेक महिन्यांपासून बंद आहेत. पथदिवे देखभाल-दुरुस्तीसाठी लागणारा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाने देण्याची मागणी पनवेल महापालिकेने केली होती. त्यानुसार बांधकाम विभागाने पालिकेला आठ कोटींचा निधी हस्तांतर केला असून या मार्गाला लवकरच झळाळी प्राप्त होणार आहे. दरम्यान, यासंदर्भात माजी नगरसेवक गुरुनाथ गायकर यांनीही यासंदर्भात पत्रव्यवहार केला होता.

**पथदिव्यांसाठी महापालिकेला आठ कोटींचा निधी मिळणार**

शीव-पनवेल महामार्गावरील पथदिवे अनेक महिन्यांपासून बंद आहेत. निधीअभावी महामार्गावरील पथदिवे त्याचबरोबर सिग्नल यंत्रणा देखभाल-दुरुस्त करणे सार्वजनिक बांधकाम विभागाला दुरापास्त झाले होते. अंधारामुळे योग्य अंदाज येत नसल्याने किरकोळ अपघाताच्या घटना घडल्याने प्रवासी वर्गात नाराजी होती. महामार्गावरील पथदिवे देखभाल व दुरुस्तीसाठी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून महापालिकेकडे हस्तांतरित करण्यात यावेत, अशा प्रकारचे आदेश सरकारकडून निर्गमित करण्यात आले.

यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नवी मुंबई महापालिका आणि पनवेल महापालिकेकडे पत्रव्यवहार करून पथदिवे स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरीत करण्याची विनंती केली होती; मात्र पनवेल महापालिकेने सीबीडी भारती विद्यापीठ ते कळंबोली जंक्शन यादरम्यानचे पथदिवे देखभाल- दुरुस्तीसाठी लागणारा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाने द्यावा, असे पत्र दिले होते. त्यानुसार बांधकाम विभागाने पालिकेला आठ कोटींचा निधी हस्तांतर केला असून बंद पथदिव्यांच्या दुरुस्तीला लवकरच सुरुवात होणार आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य शास्त्र महाविद्यालयात नुकतेच अकरावी व बारावी (वाणिज्य व शास्त्र) आंतरशालेय विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच १० डिसेंबर रोजी विज्ञान प्रदर्शन स्पर्धा व वाणिज्य प्रदर्शन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धेमध्ये नवी मुंबई झोन मधील वेगवेगळ्या अकरावी व बारावी (वाणिज्य व शास्त्र) महाविद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविले होते. या सर्व पारितोषिक विजेत्यांना पारितोषिकाचे वितरण करण्यासाठी शनिवारी (दि. १०) महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख हे उपस्थित होते. प्रमुख वक्त्यांनी स्पर्धकांनी बनवलेल्या वेगवेगळी मॉडेल्स व पोस्टर्सची पाहणी केली व विद्यार्थ्यांची स्तुती केली. तसेच सरस्वती, स्व. जनार्दन भगत साहेब, स्व. चांगू काना ठाकूर साहेब, स्व. श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून उपस्थित विद्यार्थी, पालक, शिक्षक व पारितोषिक विजेतांना मार्गदर्शन केले तसेच त्यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली व त्यांचे अभिनंदन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड कार्यक्रमाची प्रस्तावना केली व रामशेठ ठाकूर ज्युनियर महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर यांनी पारितोषिक विजेत्यांना मार्गदर्शन व त्यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सफिना मुकादम यांनी केले व कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. महेश धायगुडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

## निवडक



### विद्यार्थ्यांकडून रुग्णांना फळवाटप

**खालापूर** : खोपोलीतील केएमसी कॉलेजच्या ५ महाराष्ट्र गर्ल्स बीएन एनसीसी ग्रुप मुंबईच्या वतीने शनिवारी (दि. १०) नगरपालिका रुग्णालयात विद्यार्थ्यांनी रुग्णांना फळवाटप केले. या वेळी कॅप्टन शीतल गायकवाड, जेयूओ दिव्या नाईक, सीपीएल शिवानी वर्मा, सृष्टी देसाई, प्रेरणा मुंढे तसेच ५५ कॅडेट उपस्थित होते. शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, सदस्य दिनेश गुरव, सदस्य राजीव अभानी तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयाचे डॉ. संगीता वानखेडे, तायडे सिस्टर यांनी सहकार्य केले.

### अचला धारप यांना पुरस्कार



**रोहे** : येथील प्रतिभासंपन्न लेखिका, कवयत्री व साहित्यिक अचला धनंजय धारप यांना सर्वद फाउंडेशनचा २०२३ उत्कृष्ट लेखिका पुरस्कार जाहीर झाला आहे. २१ जानेवारी रोजी दादर येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्काराचे वितरण होणार आहे. पुरस्कारासाठी एकूण २७५ प्रस्ताव आले होते. त्यातून ३५ निवडले गेले. त्यातून रोह्याच्या अचला धारप यांची या पुरस्कारासाठी निवड झाली. याआधीही अचला धारप यांना साहित्य क्षेत्रातील विविध पुरस्कार प्राप्त झाले असून अनेक जाणकारांकडून त्यांच्या लेखनाचे वेळोवळी कौतुक झालेले आहे.

### तळा येथे आज आरोग्य शिबिर

**माणगाव** : आंबिया सोसायटी तळातर्फे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन रविवारी (दि. ११) सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत प्राथमिक आरोग्य केंद्र महागाव येथे करण्यात आले आहे. शिबिरात सर्व आजारांवर मोफत तपासणी व औषधोपचार केले जाणार असून शिबिराचा लाभ जास्तीत जास्त लोकांनी घ्यावा असे आवाहन केले आहे. डॉ. श्रुती निकम, डॉ. शबाना शेख, डॉ. आरशीया धवलारकर, डॉ. साकिब कुरुक्कर, डॉ. निजाम चोगले, डॉ. मुशरफ कादिरी हे रुग्णांची तपासणी करणार आहेत.

### खारघर येथे आज क्रीडा स्पर्धा

**पनवेल** : खारघर रेडक्लिफ स्कूल येथे रविवारी (दि. ११) पनवेल महापालिका आयोजित जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेसाठी वयोगट १४, १७ व १९ वर्षे मुले व मुली यांची वजने तालुका क्रीडा संकुल येथे घेण्यात आली. आता स्पर्धा रविवारी सकाळी ८ वाजता पनवेल महापालिका क्रीडा प्रमुख नामदेव पिचड यांच्या उपस्थितीत सुरू होईल. सर्व पाहुण्यांचे, क्रीडा प्रशिक्षकांचे व स्पर्धकांचे अमॅच्युअर तायक्वांदो असोसिएशन ऑफ रायगडच्या अध्यक्ष ॲड. प्रज्ञा संदीप भगत, उपाध्यक्ष संजय भोईर, सचिव सचिन माळी, खजिनदार रोहित सिनलकर यांच्यातर्फे स्वागत आहे.

## मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर अपघातांचा थरार

# भरधाव ट्रक चालकाविना धावला

### इतर दोन अपघातांत दोन जण ठार



**खालापूर : प्रतिनिधी**

पुणे-मुंबई द्रुतगती महमहामार्गावर शुक्रवारी (दि. ९) सायंकाळी मोठा अनर्थ टळला. सिमेंटच्या गोणी भरून पुणे येथून पनवेल येथे निघालेल्या ट्रकचा ब्रेक फेल झाल्याने ट्रक चालकाने घाबरून हँड ब्रेक मारत ट्रकमधून उडी मारली, पण जबरदस्त भार असलेला हा ट्रक उतारामुळे चालकाविना सुसाट वेगाने धावत होता, डिव्हायडरला धडकत होता. मुंबई-पुणे द्रुतगतीमार्गावर बोरघाटातील अमृतांजन पुलाजवळ ही घटना घडली.


अमृतांजन पुलापुढे गेल्यावर ट्रक थांबला आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. सुदैवाने या ट्रकमुळे कोणत्याही गाड्यांचे नुकसान झाले नाही की, कुणी जखमी झाले नाही, मात्र ही घटना काळजाचा ठोका चुकवणारी होती. एका पर्यटकाने या संपूर्ण घटनेचे मोबाईलमध्ये चित्रीकरण केले.

दुसऱ्या घटनेत मुंबई जोगेश्वरी येथील खासगी कार्यालयात काम करणारे शैलेश तावडे आपल्या सहकाऱ्याच्या लग्नसमारंभासाठी इमाजीका नोव्हेलटेन देवन्हावे येथे जात असता, टेम्पो ट्रॅव्हल द्रुतगती महामार्गावरील खालापूर टोलनाक्यावर टोल भरण्यासाठी थांबली होती. शैलेश तावडे हे रस्ता ओलांडून लघुशंकेसाठी जात होते. त्याचवेळी पाठीमागून येणाऱ्या ट्रकने धडक दिली असता तावडे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन जागीच ठार झाले. ही घटना शुक्रवारी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडली.

तिसऱ्या घटनेत द्रुतगती महामार्गावरील फुडमॉल परिसरात टेम्पोला झालेल्या अपघातात टेम्पोचालक शिव शंकर मिश्रा (वय ६०, रा. कौशलपुर कानपूर) हे ठार झाले. या घटनांची नोंद खालापूर व खोपोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## माथेरानमध्ये मानवी हक्क दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**माथेरान : राम्रपहर वृत्त**



जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त शनिवारी (दि. १०) विविध कार्यक्रम वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यालय आणि प्राचार्य गव्हाणकर विद्यालय यांचे वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेचे, वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिर, माथेरान प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर, माथेरान या दोन्हीही शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रमात सहभाग नोंदवला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला नगरपरिषदेच्या प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे (शिंदे) यांनी पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.

या वेळी संविधान त्याचप्रमाणे मानवाने माणसाशी कसे वागावे, आपले आचार, विचार, समाजात आपली वर्तणूक आणि सामाजिक बांधिलकी जोपासताना आपली काय जबाबदारी असते, आपले कर्तव्य पार पाडत असताना जनहितार्थ जी सेवा घडते त्यातूनच अंतरी समाधान प्राप्त होते, असे प्रशासक सुरेखा भणगे, शिक्षक संघपाल वाठोरे, दिलीप अहिरे यांनी नमूद केले.

या वेळी प्राथमिक शाळेचे शिक्षक दिलीप आहिरे, सचिन भोईर, अनिश पाटील, साक्षी कदम, गव्हाणकर शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पाटील, रमेश ढोले, दिनेश बागवे, विदुला गोसावी यांसह नगरपरिषदेचे कर्मचारी, अधिकारी राजेश रांजाणे, प्रविण सुर्वे, अंकुश इचके, अजय साळूंखे, जयवंत वर्तक, सदानंद इंगळे, अन्सार शेख, अभिमन्यू येळवंडे, वनिता डिघे, परिचारिका गोळे, शालेय विद्यार्थी, नगरपरिषदचे सर्व अधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन संघपाल वाठोरे यांनी केले. आभार शिक्षक रमेश ढोले यांनी मानले.

## खालापुरात एड्स दिनानिमित्ताने जनजागृती



**खालापूर : प्रतिनिधी**

जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती सप्ताहात ग्रामीण रुग्णालय चौक आयटीसी विभागाच्या वतीने सरनोबत नेताजी पालकर कनिष्ठ महाविद्यालयमध्ये जनजागृतीपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. १५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

सर्व विद्यार्थ्यांना नशामुक्त भारत अभियानाची शपथ घेऊन राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. ग्रामीण समुपदेशक अशोक लोंढे यांनी एचआयव्ही एड्सविषयाची कारणे, लक्षणे, उपचार, निरोधचे महत्त्व, एचआयव्ही व एड्समधील फरक, टीबी, गुप्तरोग या आजारांविषयी मार्गदर्शन केले, तसेच हिमोग्लोबिन महिला आरोग्य व समस्या याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक बी. बोंमले, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सविता कालेल यांची उपस्थिती होती.

याशिवाय व्यसनमुक्ती केंद्रामध्येदेखील ३९ जणांची एचआयव्ही तपासणी करण्यात आली. मोहोपाडा येथील विद्यार्थ्यांसोबत बाजारपेठ व गावामध्ये रॅली काढण्यात आली. चौक ग्रामीण रुग्णालयात २३ गरोदर मातांना गरोदरपणातील रक्ततपासण्या, सकस आहार, स्तनपान, लहान मुलांची लसीकरण, कुटुंब नियोजन, सुरक्षित मातृत्व, महिला आरोग्य व समस्या याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. ग्रेस फुल हँड संस्थेमार्फत गर्भवती महिलांना सकस आहाराचे वाटप करण्यात आले.

## आरपीआय रायगड जिल्हाध्यक्षपदी नरेंद्र गायकवाड यांची नियुक्ती

**खोपोली : प्रतिनिधी**



अनेक वर्षांपासून युवक जिल्हाध्यक्ष पदावर काम करणारे नरेंद्र गायकवाड यांची पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी रायगड जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याचे पत्र राज्याध्यक्ष राजा सरवदे यांनी गुरुवारी (दि. ८) दिले.

नवनिर्वाचित जिल्हाध्यक्षपदी नरेंद्र गायकवाड यांनी खोपोली शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शिळफाट्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केल्यानंतर कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करीत पेढेवाटप केले.

या वेळी कर्जत नगरपरिषदेचे नगरसेवक राहुल डांलिबकर, आरपीआय पक्षाचे मावळ मतदारसंघाचे संपर्क प्रमुख चिंतामणी सोनावणे, आंबेडकरी चळवळतील नेते कैलास गायकवाड, रविंद्र रोकडे, विशाल गायकवाड, तालुका कार्याध्यक्ष अशोक गोतार्णे, शिवसेना शिंदे गटाचे रोहिदास पिंगळे, मनसेचे महेश सोगे, आरपीय तालुका युवकचे सुशांत भवार, खोपोली युवक शहर अध्यक्ष रूपेश रूपवते, आप्पा गवळी, छत्तीशी विभागाचे संदीप गायकवाड, कर्जतचे विजय जाधव, सुमित सुर्वे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## रास्त भाव धान्य दुकान संघटनेकडून पुरवठा विभागाला मागण्यांबाबत निवेदन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका हा आदिवासी बहुल भाग आहे. त्यातच गरीब, गरजू, कामगार, कष्टकरी वर्ग मोठ्या प्रमाणात येथे वास्तव्यास असल्याने अनेकांच्या कुटुंबांना वेळेवर धान्य मिळत नाही आणि त्यामुळे कर्जत रास्त धान्य दुकान संघटनेकडून पुरवठा विभागाला निवेदन देऊन प्रश्न सोडविण्याची मागणी केली आहे. शासनाच्या ऑनलाइन ई-पॉस मशिनद्वारे थम्ब लावूनच धान्य मिळण्याची प्रक्रिया आता किचकट होऊ लागली आहे. चार वर्षांपूर्वी आलेली ही ई-पॉसच्या प्रक्रियेतील मशिन आता जुन्या, न चालणाऱ्या मशिन झाल्याने अनेक समस्यांना ग्राहकांना व रास्त भाव धान्य चालक-मालकांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे एकतर नवीन मशिन द्या, नाहीतर आम्हाला ऑफलाइन धान्यवाटप करण्याची परवानगी द्या, अशी मागणी रास्त भाव धान्य दुकान कर्जत तालुका चालक-मालक संघटनेने कर्जत तहसीलदार कार्यालयातील पुरवठा शाखेकडे संघटनेचे सचिव सतीश हडप यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देऊन मागणी केली आहे. कर्जत तालुक्यात सततच्या सर्व्हर डाऊनमुळे दुकानदार आणि ग्राहक यांच्यात होणाऱ्या वादामुळे त्रस्त झाले आहेत. वारंवार मशिनबाबत समस्या असल्यामुळे ग्राहक आणि दुकानदार यांच्यामध्ये असलेले चांगले संबंध वादविवादामध्ये रूपांतर होत आहे.

या प्रमुख मागण्या घेऊन संघटनेचे सचिव सतिश हडप यांच्या नेतृत्वाखाली हर्षदा हजारे, नामदेव गायकवाड, गुलचंद भोईर, राजेंद्र लाड संघटनेच्या या पदाधिकारी यांनी कर्जत तहसील कार्यालयात पुरवठा अव्वल कारकून नीता गोरेगावकर यांना निवेदन देण्यात आले आहे.

## ग्रामपंचायत निवडणुकीत आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील चार ग्रामपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक येत्या १८ डिसेंबरला होणार असून ही निवडणूक शांततेत पार पाडाव्यात, या दृष्टीने सर्व राजकीय पक्षाच्या पदाधिकारी व निवडणूक आयोगाच्या माध्यमातून काम करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे. गावात कुठल्याही विकासकामांची भूमिपूजने, जातीय धार्मिक भावना भडकेल असे वक्तव्य करू नये असे आवाहन तहसीलदार रोहन शिंदे यांनी केले.

विकासकामांबाबत कोणतीही आश्वासने किंवा मतदारांवर प्रभाव पडेल अशा वस्तूंचे वाटप करता येणार नाही. निवडणूक प्रचारसभा, रॅली परवाना, ई-प्रचार परवाना, डिजिटल बॅनर, पोस्टर परवाना, वाहन परवाना पाहिजे असेल तर त्याकरिता तहसीलदार कार्यालयात एक खिडकी कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाचे प्रमुख नारायण गोयजी आहेत, असेही ते म्हणाले.


### जाहीर नोटीस

मौजे शिलार, ता. कर्जत, जि. रायगड, कर्जत शहर व परिसरातील तमाम जनतेस सदर जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार १) श्री. मोहम्मद शमशाद पीर मोहम्मद, रा. एफ ८/३, एफ टाईप अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन, सेक्टर ५. सी बी डी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ २) श्री. नीरज मंथनवार, रा. ए ४०१, ओंकार हाईट सोसायटी, सेक्टर १९, खारघर, नवी मुंबई ४१०२१०, यांनी मला दिलेल्या माहितीवरून व दाखविलेल्या कागदपत्रावरून व तसेच मला अधिकृत केलेवरुन सबब जाहीर प्रगटन देण्यात येते की, माझे पक्षकार यांनी मौजे शिलार, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकत प्लॉट क्र. २९ अ ४८ क्षेत्र ३.६६.०० चौरस मीटर येणेप्रमाणे नमुद प्लॉट आमचे पक्षकार यांनी प्लॉट चे मूळ मालक नामे मे. ग्रीनलॅन्ड फार्म्स तर्फे प्रोप्रायटर श्री. रामचंद्र एल. खरपुरिया रा. खारघर नवी मुंबई यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा ठराव केला असुन इसारापोटी काही रक्कम अदा केलेली आहे व ठरल्याप्रमाणे उर्वरीत रक्कम देऊन आमचे पक्षकार सदर जमीनीचे नोंदणीकृत खरेदीखत करून घेणार आहेत. हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत उपरोक्त नमुद मिळकतीबाबत कोणाचे हक्कसंबंध, उजर, आक्षेप, हितसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्ट डिक्री, मृत्युपत्र, तारण, लीज, न्यायालयीन वाद इत्यादी प्रकारच्या हरकती असल्यास खालील पत्यावर योग्य त्या कागदपत्रासह लेखी उजर/ आक्षेप नोंदवावा. मुदतीनंतर आलेले आक्षेप आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व सदर मिळकत ही निर्विवाद, निःबोजा आहे असे समजुन आमचे पक्षकार सदर कार्यालयातुन नोंदणीकृत खरेदीखत करुन घेतील याची नोंद घ्यावी.

सबब जाहीर प्रगटन.
दिनांकः- ०९/१२/२०२२

सही/-
**ॲड. महेश प्र. देशपांडे,**
ए १६०१, ओंकार हाईट सोसायटी,
सेक्टर १९, खारघर, नवी मुंबई ४१०२१०.
मोबाईल क्र. ९८३३५९६४२३/८०९७२९०४२३.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - चाणजे, तालुका - उरण, जिल्हा - रायगड.**

| भुमापन नं./ हि. नं. | क्षेत्र हे. आर..पॉ. | आकार रु. पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ३२४/९ | ०-२३-८०<br>पो.ख. ०-०२-००<br>एकूण ०-२५-८० | ५.३१ | कै. रामी वामन पाटील चे वारस<br>बाबीबाई मोहन पाटील<br>हिरा रमेश थळी<br>कल्पना हरेश्वर भोईर<br>भारती ज्ञानेश्वर म्हात्रे<br>नरेश हरिश्चंद्र म्हात्रे |
| ३२८/७ | ०-०१-८० | ०.३७ | श्रीमती जयाबाई चंद्रकांत भोईर<br>जयंता चंद्रकांत भोईर |
| ३६७/१४ | ०-३-३० | ०.७२ | श्री. दत्ताराम कृष्णा म्हात्रे<br>श्री. रमेश कृष्णा म्हात्रे<br>श्री. रामचंद्र कृष्णा म्हात्रे<br>श्रीमती अनुसया कृष्णा म्हात्रे |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि. १०/१२/२०२२.

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. मो. क्र. : ९९३०३६९८६१

### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-वाजे, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिंच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : बोर्ले, तालुका-पनवेल, जिल्हा - रायगड**

| गाव | भोगवटदाराचे नाव | गट क्र व उपविभाग | क्षेत्र हे. आर. पॉ | आकारणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| बोर्ले | श्री. बळीराम गोटीराम पाटील | ३२ | ०.०३.५०<br>०.०४.५०<br>०.८.०० | ०.७४ |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या नर येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १०/१२/२०२२.**

सही/-
**ॲड. रेश्मा अ. कांबळे**
**पत्ता-** आर. एच. श्री. नित्यानंद सोसा. विजय मार्ग, प्लॉट नं. ५, सेक्टर- ३, नवीन पनवेल, ४१०२०६

# इशानचे धडाकेबाज द्विशतक

## बांगलादेशविरुद्ध टीम इंडियाचा मोठा विजय



**चट्टोग्राम : वृत्तसंस्था**

**बांगलादेशविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताच्या इशान किशनने शानदार फटकेबाजी करीत कारकीर्दीतील पहिले द्विशतक झळकाविले. इशानचे द्विशतक आणि विराट कोहलीचे शतक या जोरावर भारतीय संघाने आठ बाद ४०९ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात बांगलादेशचा डाव १८२ धावांत संपुष्टात आला.**

भारतासाठीच्या 'करो या मरो'च्या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकत गोलंदाजीचा निर्णय घेतला. भारताकडून डावाची सुरुवात करण्यासाठी शिखर धवन आणि ईशान किशन हे मैदानावर उतरले होते. धवन तीन धावांवर तंबूत परतला, मात्र किशन खेळपट्टीवर टिकून राहिला आणि त्याने संघासाठी खोऱ्याने धावा काढल्या. इशानने केवळ १२६ चेंडूंत आपले द्विशतक पूर्ण केले आणि १३१ चेंडूंत २१० धावा करून तो बाद झाला. त्याने सगळ्यात कमी चेंडू घेत द्विशतक करून ख्रिस गेलचा विक्रम मोडीत काढला. गेलने १३८ चेंडूंत आपले द्विशतक पूर्ण केले होते व तो १४७ चेंडूंत २१५ धावा करून बाद झाला होता.

४१० धावांचे आव्हान गाठण्यासाठी मैदानात उतरलेल्या बांगलादेशचे गडी ठराविक अंतराने बाद होत गेले. सरतेशेवटी ३४ षटकांत यजमान सर्वबाद झाले आणि भारताने तब्बल २२७ धावांनी हा सामना जिंकला.


### विराटने शतक झळकावून रिकी पाँटिंगला टाकले मागे

बांगलादेशविरुद्धच्या तिसऱ्या वनडेत भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीने शतक झळकाविले. विराटचे हे त्याच्या वनडे कारकिर्दीतील ४४वे, तर एकूण आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील ७२वे शतक आहे. याचबरोबर त्याने ऑस्ट्रेलियाच्या रिकी पाँटिंगचा विक्रम मोडला आहे. विराटने ८५ चेंडूंत एक षटकार आणि ११ चौकारांच्या मदतीने आपले शतक पूर्ण केले. त्याचे हे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील ७२वे शतक आहे. पाँटिंगने आपल्या कारकिर्दित एकूण ७१ शतके झळकाविली आहेत. त्याला विराटने मागे टाकले.

# अर्जेंटिना उपांत्य फेरीत

## पेनल्टी शूटआऊटमध्ये नेदरलँडचा पराभव

**लुसेल : वृत्तसंस्था**




अर्जेंटिनाने पेनल्टी शूटआऊटमध्ये ४-३ असा विजय मिळवित फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. विश्वचषकाच्या इतिहासात मेस्सीचे १० गोल झाले आहेत. यासह मेस्सीने माजी देशबांधव गॅब्रिएल बतिस्तुताची बरोबरी केली.

अर्जेंटिनाच्या संघाने सामन्याच्या सुरुवातीपासूनच नेदरलँड्सवर मजबूत पकड ठेवली होती. ३५व्या मिनिटाला नहुएल मोलिनाने डच बचावातून गोल केला. विरोधी खेळाडूंनी घेरल्यानंतर कर्णधार मेस्सीने पास दिला, त्याचा फायदा मोलिनाने घेतला. दुसरीकडे नेदरलँड संघात बदली खेळाडू म्हणून आलेल्या अबाउट वेघोरस्टने सामन्याचे चित्र पूर्णपणे फिरवले. ८३व्या मिनिटाला वेघोरस्टने गोल करीत नेदरलँड्सला पुन्हा रुळावर आणले. ९० मिनिटापर्यंत अर्जेंटिनाच्या बाजूने स्कोअर २-१ होता. रेफरीने १० मिनिटे दुखापतीची वेळ दिली. वेघोरस्टने दुखापती वेळेच्या शेवटच्या मिनिटाला दुसरा गोल करून अर्जेंटिनाला चकित केले. सामना अतिरिक्त वेळेत पोहोचला. आता दोन्ही संघांना गोल करण्यासाठी आणखी ३० मिनिटे शिल्लक होती, परंतु यादरम्यान कोणीही गोल करू शकला नाही. अतिरिक्त वेळेनंतरही स्कोअर २-२ असा बरोबरीत राहिला

पेनल्टी शूटआऊटमध्ये अर्जेंटिनाची गोलरक्षक एमी मार्टिनेझने शानदार कामगिरी केली. त्याने तीन फटके रोखले. त्याचवेळी लिओनेल मेस्सी, लियनार्डो पेरेडेज, गोंजालो मोंटियाल आणि लौटारो मार्टिनेज हे अर्जेंटिनासाठी गोल करण्यात यशस्वी राहिले.

# ब्राझील विश्वचषकातून बाहेर; क्रोएशियाने मारली बाजी



**अल रायन : वृत्तसंस्था**

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत ब्राझील आणि क्रोएशिया या संघांमध्ये चुरशीचा सामना रंगला. या सामना पेनेल्टी शूटआऊटमध्ये गेल्यानंतर ब्राझीलला पराभवाचा सामना करावा लागला. या पराजयामुळे ब्राझील विश्वचषकातून बाहेर पडला आहे, तर क्रोएशियाने हा सामना ४-२ने जिंकत उपांत्य फेरीत धडक मारली आहे.

उपांत्यपूर्व फेरीतील या सामन्यात निर्धारीत ९० मिनिटांमध्ये ब्राझील अथवा क्रोएशिया अशा कोणत्याच संघाला गोल करता आला नाही. वाढवून दिलेल्या वेळेत दोन्ही संघाकडून आक्रमक खेळ करण्यात आला. यामध्ये १०६व्या मिनिटाला ब्राझीलच्या नेमारने जबरदस्त गोल करीत १-०ने आघाडी घेतली. त्यामुळे हा सामना ब्राझीलच जिंकेल, अशी आशा फुटबॉल चाहत्यांना होती, पण क्रोएशियाने ११६व्या मिनिटाला गोल करीत सामना बरोबरीत आणला. त्यानंतर हा सामना पेनेल्टी शूटआऊटमध्ये गेला. पेनेल्टी शूटआऊटमध्ये ब्राझीलची पहिली कीक क्रोएशियाचा गोलरक्षक लिवाकोविचने अडवले, तर चौथी कीक गोलपोस्टला लागून बाहेर गेली. क्रोएशियाच्या खेळाडूंनी आपल्या चारही कीक अचूक मारल्या आणि संघाला उपांत्य फेरीत नेले.

# किशोर, किशोरी गट अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत वेश्वीला दुहेरी मुकुट

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे बांधण येथे आयोजित करण्यात आलेल्या रायगड जिल्हा किशोर, किशोरी गट अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत ओंकार क्रीडा मंडळ वेश्वी या संघाने दोन्ही गटांत विजेतेपद पटकावून दुहेरी मुकुट मिळवला. मुलांच्या गटात वेणगाव, तर मुलींमध्ये बांधण हे संघ उपविजेते ठरले.



राजू समजोसकर मित्र मंडळ बांधण यांच्या यजमानपदाखाली रायगड जिल्हा किशोर, किशोरी गट निवड चाचणी कबड्डी स्पर्धा बांधण आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत किशोर गटामध्ये ६४, तर किशोरी गटामध्ये १६ संघ सहभागी झाले होते. रायगड जिल्ह्याच्या कबड्डी इतिहासात जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत दुहेरी मुकूट मिळवणारा ओंकार वेश्वी हा पहिला संघ ठरला आहे. वेश्वी संघाने दुहेरी मुकूट मिळविल्यामुळे या संघाचे खेळाडू आणि प्रशिक्षक प्रफुल्ल पाटील यांचे अभिनंदन होत आहे.

मुलांचा अंतिम सामना ओंकार वेश्वी आणि वेणगाव या संघांमध्ये झाला. हा सामना वेश्वी संघाने एकतर्फी झाला. वेश्वीने या लढतीत वेणगावचे आव्हान ३४-१७ असे परतवित विजेतेपद पटकाविले. या सामन्यात वेश्वीकडून प्रज्वल नलावडे, वरूण पाटील, कर्णधार प्रेम कांबळी यांनी अष्टपैलू खेळ केला. कौस्तुभ शेळके, नीरज हराळे, ओम शेळके, शुभम हराळे यांनी चांगली साथ दिली.

मुलींचा अंतिम सामना ओंकार वेश्वी व प्रतिस्पर्धी बांधण या संघांत रंगतदार झाला. दोन्ही संघांनी पकडी व चढायांचा बहरदार खेळ करून गुणपत्रक हलता ठेवत होता. शेवटी हा सामना समान गुणांवर संपून पाच पाच चढायांवर खेळविण्यात आला. शेवटच्या चढाईत वेश्वीची कर्णधार वैष्णवी पाटीलने तीन खेळाडू बाद केले. त्यामुळे हा सामना या संघाने ३३-३० असा जिंकून अजिंक्य पटकाविले. वेश्वीकडून वैष्णवी पाटील, अनन्या निर्मळ, सानिका गोल यांनी सुरेख खेळ केला. त्यांना सोनाली हर्णे, प्रचिती मुलूरकर, पायल धनगर, साभा खान यांनी चांगली साथ दिली. बांधण संघाकडून प्रिया गायकर, नेहाली पाटील छान खेळल्या.

मुलांच्या पहिल्या उपांत्य फेरीत वेश्वी संघाने मरिआई धेंरड संघाचा निसटता पराभव करून अंतिम फेरीत खेळण्याचा मान मिळविला, तर दुसऱ्या उपांत्य फेरीत वेणगांव संघाने मळेकर संघाचा एकतर्फी पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. मुलींच्या पहिल्या सेमीफायनलमध्ये बांधण संघाने दत्तात्रय स्पोर्ट्स पनवेल संघाचा पराभव केला, तर दुसऱ्या सेमी फायनलमध्ये वेश्वी संघाने भिलेश्वर किहीम संघाचा पराभव करून अंतिम फेरी गाठली होती.

पारितोषिक वितरण दिलीप भोईर, संदेश पवार, सचिन तावडे, राजू समजीकर यांच्या हस्ते झाले. या वेळी कबड्डी असोसिएशनचे सहकार्यवाह जे. जे. पाटीलही उपस्थित होते.







**पनवेल : आजिवली गावस्थित आयरन माउंटन कंपनीने कामगारांना कामावरून कमी केल्याने त्या विरोधात भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. कामगारांना कामावर पूर्ववत घ्या; नाही तर यापेक्षा मोठे आंदोलन करण्याचा इशारा आमदार प्रशांत ठाकूर यांनी कंपनी व्यवस्थापनाला दिला आहे.**













दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com